* मुख्य संपादक *
सुग्रीव सोपानराव मुंडे
* आवृत्ती संपादक *
लक्ष्मीकांत नामदेवराव मुंडे

निपक्ष व निर्भिड वृत्तपत्र

# आत्ताच एक्सप्रेस

* नांदेड * परभणी * हिंगोली

E-Paper :
www. attachexpress.in
Post Regd.No.
LII/PBN/RNP-183/20021-22

* वर्ष १० वे * अंक २९४ * किंमत - २ रु
RNI.No. MAH/MAR2014/56289
* शुक्रवार दि.२७ फेब्रुवारी २०२६
* पाने-४

## राजकीय रणनितीचा करिश्मा घडवणारे युवा नेतृत्व - करण एन्ड्रलवार यांच्या वाढदिवसाचा उत्साह शिगेला



* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट –** शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे आक्रमक, अभ्यासू आणि दूरदृष्टी असलेले युवा नेतृत्व म्हणून अल्पावधीतच जनमानसात ठसा उमटवणारे करण विनोद एन्ड्रलवार यांचा आज दि. २७ फेब्रुवारी रोजी वाढदिवस मोठ्या उत्साहात साजरा होत आहे. या निमित्ताने किनवट व गोकुंदा शहरात कार्यकर्त्यांमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून शहराच्या कानाकोपऱ्यात शुभेच्छांचे भव्य बॅनर्स झळकत आहेत. सोशल मीडियावरही शुभेच्छांचा वर्षाव होत असून समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण पाहायला मिळत आहे.

**राजकीय रणनीतीचा 'करण' करिश्मा**

राजकारणात प्रवेश केल्यानंतर अत्यंत कमी कालावधीत करण एन्ड्रलवार यांनी आपल्या संघटन कौशल्याची प्रभावी छाप पाडली आहे. किनवट नगरपालिकेच्या निवडणुकीत त्यांनी आखलेली अचूक रणनीती आणि कार्यकर्त्यांचे प्रभावी संघटन यामुळे शिवसेनेचा भगवा नगरपालिकेवर फडकला. विशेष म्हणजे, त्यांच्या मातोश्री सौ. सुजाता विनोद एन्ड्रलवार यांना प्रचंड मताधिक्याने विजयी करून नगराध्यक्ष पदावर विराजमान करण्यात त्यांचा महत्त्वपूर्ण वाटा राहिला आहे. त्यांच्या या रणनीतिक कौशल्यामुळे ते स्थानिक राजकारणातील प्रभावी नियोजक म्हणून ओळखले जातात.

**जनतेशी थेट संवाद, कार्यकर्त्यांचा विश्वास**

करण एन्ड्रलवार यांची ओळख केवळ निवडणूक रणनीतीकार म्हणून नाही, तर सर्वसामान्य नागरिकांच्या प्रश्नांसाठी तत्पर धावून जाणारे लोकाभिमुख नेतृत्व म्हणूनही आहे.



''सामान्य माणसाच्या कामासाठी सदैव तत्पर असणारे आणि युवकांना दिशा देणारे नेतृत्व म्हणून आमचे दिलदार व दानशूर मित्र करण एन्ड्रलवार यांनी एक वेगळी ओळख निर्माण केली आहे.त्यांच्या या सामाजिक व राजकीय प्रवासास वाढदिवसानिमित्त भरभरून मनस्वी मंगलमय शुभेच्छा

**– लक्ष्मीकांत मुंडे**
(संपादक/अभिनेता/दिग्दर्शक)

पाणी, रस्ते, शैक्षणिक सुविधा, युवकांचे प्रश्न आणि शासकीय योजनांचा लाभ जनतेपर्यंत पोहोचविण्यासाठी ते सातत्याने प्रयत्नशील असतात. त्यांच्या कार्यपद्धतीत लोकांशी थेट संवाद आणि त्वरित प्रतिसाद ही वैशिष्ट्ये ठळकपणे दिसून येतात.

**युवकांमध्ये प्रचंड लोकप्रियता**

किनवट व गोकुंदा परिसरातील युवकांशी त्यांचे घट्ट नाते असल्यामुळे युवकांमध्ये त्यांची लोकप्रियता दिवसेंदिवस वाढत आहे. युवकांना संघटन, सामाजिक कार्य आणि सकारात्मक राजकारणाची दिशा देणारे नेतृत्व म्हणून ते ओळखले जातात. त्यांच्या वाढदिवसानिमित्त युवकांनी विविध सेवा व सामाजिक उपक्रमांचे आयोजन करून त्यांच्याप्रती असलेला आदर व्यक्त केला आहे.

**सामाजिक बांधिलकीची जाणीव**

वाढदिवसाचे औचित्य साधून कार्यकर्त्यांकडून रक्तदान शिबिर, गरजूंसाठी मदत, स्वच्छता अभियान, वृक्षारोपण आणि सामाजिक जनजागृती उपक्रमांचे आयोजन करण्यात आले आहे. समाजाशी असलेली बांधिलकी आणि सेवा वृत्ती ही त्यांच्या नेतृत्वाची खरी ताकद असल्याचे समर्थक सांगतात. शहरात लागलेले फलक, कार्यकर्त्यांची धडपड आणि सोशल मीडियावर सुरू असलेला शुभेच्छांचा ट्रेंड पाहता करण एन्ड्रलवार यांचा वाढदिवस केवळ उत्सव नसून जनतेशी असलेल्या नात्याचा आणि नेतृत्वावरील विश्वासाचा उत्सव ठरत आहे.

## सुनेत्रा पवार राष्ट्रवादी काँग्रेसच्या राष्ट्रीय अध्यक्ष; अजित पवार गटाच्या बैठकीत शिक्कामोर्तब

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक रचनेत मोठी फेरबदल करण्यात आले असून सुनेत्रा पवार यांच्याकडे आता राष्ट्रीय अध्यक्षपदाची धुरा सोपवण्यात आली आहे. अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाल्यानंतर राज्याच्या राजकारणात अनेक बदल झाले आहेत. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या पत्नी व महाराष्ट्राच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांची राष्ट्रवादी काँग्रेसच्या (एनसीपी) अध्यक्षपदी बिनविरोध निवड झाली आहे. अजित पवारांकडे उपमुख्यमंत्री पदासह पक्षाचे राष्ट्रीय अध्यक्षपदही होते. त्यामुळे सुनेत्रा पवार यांची या पदावर नियुक्ती होणे निश्चित मानले जात होते. अजितदादांच्या जाण्याने मोठी पोकळी निर्माण झाली आहे. ही पोकळी भरून निघणे शक्यच नाही. आपल्या सगळ्यांच्या मनात एकच नाव आहे - अजितदादा, असे म्हणताना सुनेत्रा पवार भावुक झाल्या.



राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या राष्ट्रीय कार्यकारिणीची बैठक आज वरळी डोम येथील सभागृहात पार पडली. यावेळी राष्ट्रीय कार्यकारी अध्यक्ष प्रफुल पटेल यांनी सुनेत्रा पवार यांच्या नावाचा प्रस्ताव मांडला. त्याला सर्व सदस्यांनी हात उंचावून पाठिंबा दिला. यानंतर सुनेत्रा पवार यांची राष्ट्रीय अध्यक्षपदी एकमताने निवड झाल्याचे प्रफुल पटेल यांनी जाहीर केले.

प्रफुल पटेल यांनी यावेळी अजित पवारांच्या आठवणींना उजाळा दिला. अजित पवार यांच्या नेतृत्वाविषयी बोलताना पटेल म्हणाले, ज्या प्रकारे एखादा सेनापती सैन्याच्या पुढे उभा राहून नेतृत्व करतो, त्याप्रमाणे अजित पवार सर्व निवडणुकांमध्ये कार्यकर्त्यांचे नेतृत्व करत होते. त्यामुळेच २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत अजित पवारांच्या नेतृत्वामुळेच राष्ट्रवादी काँग्रेसचे चांगल्या संख्येने आमदार निवडून आले.

अजित पवार यांच्या पश्चात पक्षाच्या अध्यक्षपदी कोणाची निवड होणार याची उत्सुकता होती. मध्यंतरी प्रफुल्ल पटेल यांच्या नावाची चर्चा होती, पण त्यांनी या चर्चांना फ ेटाळून लावले. सर्व कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करूनच निवड केली जाईल, असे पटेल यांनी स्पष्ट केले होते. सुनेत्रा पवार यांच्या पाठीशी सर्व नेतेमंडळी ठाम उभी राहणार असून, पक्ष बळकट करण्यावर भर देण्यात येणार आहे, असेही ते म्हणाले होते.

सुनेत्रा पवार म्हणाल्या, आदरणीय दादा आज आपल्यात नाहीत, हे अजूनही मन मानायला तयार नाही. हा आघात प्रचंड आहे. मात्र, वास्तव मान्य करायला पाहिजे. यातून आपल्याला बाहेर पडले पाहिजे. कारण आपली राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष हा केवळ पक्ष नाही, हा विचार आहे, परिवार आहे. हा विचार पुढे नेण्यासाठी आपल्याला निर्धाराने पुढे जावे लागणार आहे. मला आणि आपल्या सगळ्यांना माहित आहे की दादांची पोकळी कधीच भरून निघू शकणार नाही. पण त्यांनी दाखवलेला विकास मार्ग, त्यांची जिद्द, त्यांची शिस्त हीच खरी राष्ट्रवादी आहे.

## अजित पवारांच्या विमान दुर्घटनेवरुन कायदेशीर कारवाईसाठी रोहित पवार दुसऱ्या दिवशीही आक्रमक

**आत्ताच एक्सप्रेस**

**बारामती –** बारामतीत शरद पवारांच्या पक्षाचे आमदार रोहित पवार यांची आणि बारामती पोलिस स्टेशनमध्ये पोलिसांसोबत वादावादी झाल्याची माहिती आहे. काल (बुधवारी, ता २५) मरिन ड्राईव्ह पोलिस ठाण्यात देखील रोहित पवारांची पोलिसांसोबत बाचाबाची झाली होती, तर आज देखील बारामती पोलिस रोहित पवारांची तक्रार घेतील पण त्यांनी गुन्हा नोंद करून घेण्यास नकार दिला असल्याची सूत्रांची माहिती आहे. पोलिस रोहित पवारांची एफआयआर दाखल करून घेत नसल्याने रोहित पवार आक्रमक झाल्याचे दिसून येत आहेत. तर आमची केस खोटी आहे आमचा एफआयआर खोटा आहे असं सांगा मग, आम्हाला एफआयआर तरी द्या नाहीतर मी खोटं एफ आय आर करतोय म्हणून माझ्यावरती कारवाई करून टाका, असंही त्यांनी म्हटलं आहे.

रोहित पवार, युगेंद्र पवार यांच्यासह काही स्थानिक नेते, आणि वकिल हे पोलिसांना काही गोष्टी व्यवस्थित पटवून सांगण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र पोलिस तक्रार दाखल करून घेत आहेत, मात्र एफआयआर दाखल करून घेत नसल्याचं समोर येत आहे. पोलिस रोहित पवारांची तक्रार घेतील पण त्यांनी गुन्हा नोंद करून घेण्यास नकार दिला असल्याची सूत्रांची माहिती आहे.

रोहित पवार पोलिसांना सर्व गोष्टी पटवून देण्याचा प्रयत्न करत आहेत, मात्र पोलिस तक्रारीवरती ठाम असल्याचं सांगितलं जात आहे. यावेळी रोहित पवारांनी पोलिसांशी बोलताना म्हटलं की, आमची केस खोटी आहे, आमचा एफआयआर खोटा आहे असं सांगा मग, आम्हाला एफआयआर तरी द्या नाहीतर मी खोटं एफआयआर करतोय म्हणून माझ्यावरती कारवाई करून टाका.

एक महिना झालं एक तरी स्टेटमेंट आलं आहे का सीआयडी कडून, सीआयडीने कोणाला बोलावलं का नाही, त्याचा मालक रोहित सिंग अमेरिकेत जाऊन आला, तो दिल्लीत बसला, सीआयडीने त्याला आणखी बोलावलं नाही, व्ही के सिंग जो मालक आहे, त्यालाही अद्याप पर्यंत बोलावलेलं नाही, त्या विमानाचा मेंटेनन्स करणारा जो त्यांचा माणूस आहे महाराष्ट्रातला त्यालाही अद्याप पर्यंत बोलावलेलं नाही, आतापर्यंत त्यांनी सीसीटीव्ही इथलेच गोळा केले आहेत, विमानात जे पायलट येणार होते ते अचानक कॅन्सल झाले, का कॅन्सल झाले? त्यांना आतापर्यंत बोलावलेलं नाही, मग नेमकं चाललं काय आहे, डीजीसीएच्या कोणत्या अधिकाऱ्याने या सगळ्याला मंजुरी दिली आहे, असंही यावेळी त्यांनी पोलिसांशी बोलताना सांगितलं आहे.

## मेधा सोमय्या मानहानी प्रकरणात संजय राऊत निर्दोष

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** भाजपचे माजी खासदार किरीट सोमय्या यांची पत्नी मेधा सोमय्या यांच्या मानहानी खटल्यात मुंबई सत्र न्यायालयाने मोठा निर्णय दिला आहे. याप्रकरणात ठाकरेंच्या शिवसेनेचे खासदार संजय राऊत यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे. किरीट सोमय्या आणि त्यांच्या पत्नी मेधा यांनी १०० कोटींचा शौचालय घोटाळा केल्याचा आरोप संजय राऊत यांनी केला होता. मिरा भाईंदर शहरात २०२२ साली १५४ सार्वजनिक शौचालयं बांधण्याचे कंत्राट निघालं होतं. त्यातील १६ शौचालयांचे काम मेधा सोमय्यांच्या युवा प्रतिष्ठानला मिळालं होतं. यात सीआरझेडचे उल्लंघन करण्यात आलं, कामात बनावट कागदपत्रे सादर करण्यात आली आणि मिरा भाईंदर पालिकेची फसवणूक करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला होता. यावर मेधा किरीट सोमय्या यांनी संजय राऊतांच्या विरोधात न्यायलयात अब्रुनुकसानीचा दावा दाखल केला होता. याप्रकरणी आता संजय राऊत यांची निर्दोष मुक्तता करण्यात आली आहे.

मेधा सोमय्या यांनी संजय राऊत यांच्याविरुद्ध अब्रुनुकसानीचा खटला दाखल केला होता . या प्रकरणी माझगांव दंडाधिकारी न्यायालयाने राऊत यांना दोषी ठरवत १५ दिवसांची कोठडी आणि २५ हजारांचा दंड देखील ठोठावला होता. या शिक्षेला संजय राऊत यांनी सत्र न्यायालयात आव्हान दिलं होतं.

## संतोष देशमुख हत्याप्रकरणी वाल्मिक कराडचा जामीन अर्ज फेटाळला; सुप्रीम कोर्टाचा दणका

**आत्ताच एक्सप्रेस**

**नवी दिल्ली** - बीडमधील संतोष देशमुख हत्याप्रकरणातील आरोपी वाल्मिक कराडच्या जामीनाबाबत सुप्रीम कोर्टाने मोठा निर्णय घेतला आहे. वाल्मिक कराडचा जामीन अर्ज सर्वोच्च न्यायालयाने फेटाळला. न्यायमूर्ती एम एम सुंदरेश यांच्यासमोर आज वाल्मिक कराडच्या जामीन अर्जावर सुनावणी झाली. त्यावेळी सर्वोच्च न्यायालयाने सुनावणी करण्यास नकार दिला. दरम्यान, सुप्रीम कोर्टाने आज जरी जामीन नाकारला असला तरी वाल्मिक कराडला पुन्हा जामीनासाठी अर्ज करता येणार आहे, पण त्यासाठी वाट पाहावी लागणार आह. कारण जर ट्रायल पुढे जात नसेल तर वर्षभरात पुन्हा वाल्मिक कराड सर्वोच्च न्यायालयात येऊ शकतो. या प्रकरणाची पहिली सुनावणी १९ फेब्रुवारी रोजी करण्यात आली होती. त्यानंतर आज या प्रकरणाची सुनावणी पार पडल्यानंतर सुप्रीम कोर्टाने हा जामीन अर्ज फेटाळलाय. याआधी सुप्रीम कोर्टाच्या औरंगाबाद खंडपीठात आणि बीड जिल्हा न्यायालयात वाल्मीक कराड याचा जामीन अर्ज आणि दोष मुक्तीचा अर्ज फ ेटाळण्यात आला होता.

एकीकडे संतोष देशमुख हत्याप्रकरणातील फरार आरोपी कृष्णा आंधळे हा गावात तीनवेळा येऊन गेल्या आरोप, संतोष देशमुख यांचे बंधू धनंजय देशमुख यांनी केला होता. ते प्रकरण ताजे असतानाच, आता सुप्रीम कोर्टाने वाल्मिक कराडला झटका दिला आहे.

दरम्यान, सुप्रीम कोर्टातील आजच्या सुनावणीपूर्वी धनंजय देशमुख यांनी याबाबत कॅव्हेट दाखल केलं होतं. आमचे म्हणणे आम्ही न्यायालयात देणार असल्याचं देशमुख यांनी म्हटलं होतं. मागील दीड वर्षांपासून देशमुख कुटुंब आजही न्यायाच्या प्रतीक्षेत असल्याचेही ते म्हणाले.

## महाराष्ट्राची अर्थव्यवस्था गतीशील; विरोधकांनी संभ्रमातून बाहेर पडावे-मुख्यमंत्री

**आत्ताच एक्सप्रेस**

**मुंबई –** राज्य सरकारचे अर्थसंकल्पीय अधिवेशन सुरू झाले असून मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्यपालांच्या अभिभाषणावर सभागृहात चर्चा केली. यावेळी, राज्यातील विविध मुद्द्यांवर त्यांनी आपली भूमिका मांडली. त्यामध्ये, टीपू सुलताना, दावोस करार, विरोधकांचे आरोप, एबीसीची रेड, नरहरी झिरवाळ प्रकरण, मराठी शाळा, हिंदी-मराठी भाषेसह अनेक विषयांवर चर्चा केली. तसेच, सभागृहात आमदार भास्कर जाधव यांनी उपस्थित केलेल्या मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण अभियानासंदर्भातील प्रश्नावरही उत्तर दिले. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी आपल्या भाषणात विरोधी पक्षांना लक्ष्य केले. विरोधी पक्ष हा भ्रमित आणि संभ्रमित आहे, असे दिसते. माझी त्यांना सूचना आहे की, भ्रमात राहून धावण्यापेक्षा संभ्रमातून बाहेर पडण्यासाठी शांतपणे विचार करुन मुद्दे मांडले पाहिजेत. जेणेकरुन महाराष्ट्राच्या हितात तुमचे योगदान वाढेल. ट्रिलियन डॉलर अर्थव्यवस्था, विकसित भारत, महाराष्ट्राची वाटचाल, दावोस करारासंदर्भातही स्पष्टीकरण दिले.

२०४७ पर्यंत ५ ट्रिलियन डॉलर पर्यंतची अर्थव्यवस्था तयार करायची, १० लाख रोजगार दरवर्षी तयार करायचे आहेत. वित्तीय शिस्त आणि शाश्वत विकास यात वित्तीयची तूट २.५ टक्क्यांखाली आणायची आहे. शंभर उपक्रम घेतले आहेत, ज्यात व्हिजन मॅनेजमेंट तयार केले आहेत. मॅकेन्जीसारखी कंपनी आपण सोबत घेतली आहे, हे पुस्तक तयार करण्याइतके सोपे नाही. बजेट ट्रिलियन डॉलर नाही करायचे, अर्थव्यवस्था तयार करायची आहे. आज अर्थव्यवस्था ५१ लाख कोटीला पोहोचली आहे, साधारण ४० लाख कोटींपर्यंत आणखी विस्तारीत करायची आहे. सन २०१२-१३ साली १३ लाख कोटी रुपयांची अर्थव्यवस्था आपल्या राज्याची होती, आता ती ३ पट गेली आहे. फक्त १० वर्षात ३ पट अर्थव्यवस्था गेली आहे. महाराष्ट्र एकमेव आहे, ६६० बिलियन डॉलरपर्यंत आपण पोहोचलो आहोत, इतर कोणतंही राज्य आपल्या जवळपास नाही. आपण हाफ ट्रिलियन पार करत पुढे गेलो आहोत. पुढील ४-५ वर्षात दुष्काळी वर्ष आलं नाही तर आपण ट्रिलियन होऊ मात्र नाहीतर १-२ वर्षे त्याचा इफेक्ट राहातो. जगात काही देशांची अर्थव्यवस्था देखील ट्रिलियन डॉलर नाही, बेल्जियमची आहे, तेवढे आपण होऊ, अशी माहिती फडणवीसांनी सभागृहात दिली.

देवेंद्र फडणवीस म्हणाले की, मुख्यमंत्री युवा प्रशिक्षण अभियान हे ११ महिन्यांसाठी असणार ते आधीच घोषित केले होते, इतरत्र नोकरीला जाताना उमेदवारांना फायदा व्हावा यासाठी त्यांना अनुभवपत्र देण्यात आले होते. प्रशिक्षणार्थी युवकांना पर्मनंट करणार हे सांगितल्याचे भास्कर जाधव म्हणाले, तसं रेकॉर्ड आमच्याकडे आहे असंही ते बोलले. मात्र, तसे रेकॉर्ड असेल तर पाठवून द्या . युवा प्रशिक्षण युवकांना पर्मनंट करतो हे सांगणाऱ्या मंत्र्याचा अहवालच राज्यपालांकडे पाठवतो,



असे म्हणत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी भास्कर जाधवांचे मत खोडून काढले. चांगल्याला चांगलं म्हणायला शिका. विरोधी पक्षाने चहापानपासून राजकारण करायला सुरुवात केली. हम नही सुधरेंगे असं ते आहे. ते म्हणाले, यांची काळी चहा-कॉफी पिणार नाही. आम्ही त्यांचे काळे धंदे बाहेर काढ, ज्यांनी काळे धंदे केले त्यांना लोकांनी घरी बसवले आणि आम्ही तुम्हाला काळा चहा पाजला नसता. आम्ही गोकुळ दुधाचा चहा पाजला असता, असा टोला मुख्यमंत्र्यांनी लगावला. शाळेत हिंदी भाषेच्या सक्तीसंदर्भाने राज्याने काय स्विकारले ते पाहा, मंत्रिमंडळापेक्षा मोठे कुणीही नाही, त्याच मंत्रिमंडळाने शिफारस स्विकारली. ही शिफारस उद्धव ठाकरे यांच्या मंत्रिमंडळाने स्विकारली. विरोधकांची स्थिती म्हणजे करून करून भागले आणि देवपूजेला लागले, तुमच्यासोबत राजसाहेब पण नादी लागले, असे म्हणत देवेंद्र फडणवीसांनी राज ठाकरेंनाही टोला लगावला. तसेच, मी रेकॉर्डवर आणू इच्छितो की, दोन भाऊ एकत्र आल्याचे श्रेय देवेंद्र फडणवीसला आहे, असेही ते म्हणाले. महाराष्ट्रात मराठीच अनिवार्य आहे. मराठी शाळा बंद पडल्या नाहीत, ८४ टक्के शाळा मराठी माध्यमांच्या आहेत, ६९ टक्के विद्यार्थी मराठी शिकत आहेत. मराठी शाळा बंद पडल्याची माहिती कपोलकल्पित आहे, असेही फडणवीसांनी सांगितले.

कुंभमेळ्यामुळे यूपीचे ब्रँडिंग हे जगात झाले, आपल्याला ही कुंभमेळ्यातून जगात महाराष्ट्राचे ब्रँडिंग करायचे आहे. महाराष्ट्र ही संतांची भूमी आहे, ती जोपासायची आहे, असे मुख्यमंत्र्यांनी म्हटले. नवीन शैक्षणिक धोरणासाठी २१ सप्टेंबर २०२० साली मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांनी समिती नेमली, त्यात वेगवेगळे कुलगुरू होते, शिक्षणतज्ज्ञ होते. विजय कदम हे महत्वाचे नाव आहे, ते ठाकरे सेनेचे नेते पण आहेत. या कमिटीत १६ लोक मराठी होते. या समितीने उद्धव साहेबांकडे अहवाल दिला. त्यावर उद्धवजींनी अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले. १५ सप्टेंबर २०२१ रोजी यावर बातम्या झाल्या. बदलत्या काळात या शिफारसीनुसार, महाराष्ट्राला शैक्षणिकदृष्ट्या प्रगतीपथावर ठेवण्यासाठी या शिफारसी गरजेच्या आहेत, अशी माहिती मुख्यमंत्र्यांनी दिली. या शिफारसमध्ये इंग्रजी व हिंदी भाषा ही दुसरी भाषा म्हणून पहिल्या वर्षापासून लागू करावी असे म्हटलंय. पहिली ते बारावी इंग्रजी शिकतील, उच्च शिक्षण संस्थांमध्ये मराठीला प्राधान्य द्यावेच लागेल. पण इंग्रजी व हिंदी पहिली ते बारावीपर्यंत सक्तीची करावी, अशी माहितीही फडणवीसांनी दिली. मी जयंत पाटील यांना विचारतो, अहवाल मंत्रिमंडळ स्विकारतो ना? १४ सप्टेंबर २०२१ रोजी अहवाल सादर झाला. २० सप्टेंबर रोजी तो मंत्रिमंडळात ठेवला. मी त्याचे इतिवृत्त घेऊन आलो आहे. डॉ. माशेलकर समितीचा अहवाल मुख्यमंत्र्यांनी वाचून दाखवला. तसेच, यावर सही कुणाची? आदित्य जी सांगतील ना? मंत्री कोणीही असू द्या असे म्हणत मुख्यमंत्र्यांनी विरोधकांना कोंडीत पकडले. तसेच, मुख्यमंत्री असताना मंत्र्यांचे काहीही अस्तित्व नसते, असेही त्यांनी म्हटले. देशाचे स्टार्टअप हब हे आता बंगलोर नाही तर महाराष्ट्र आहे, देशातील २० टक्के स्टार्टअप एकट्या महाराष्ट्रात आहे. युनिकॉर्न म्हणजे मोठे स्टार्ट अप हे देशातील १२९ पैकी २८ हे महाराष्ट्रात आहेत. स्टार्टअप कॅपिटल म्हणून महाराष्ट्राकडे आपण पाहू शकतो. जयंतराव तुम्ही थ्री इडियट्समधील एक डायलॉग ऐकवला, दुसरा डायलॉग मी ऐकवतो, ''काळजी करू नका, ऑल इज वेल..'' असे म्हणत देशातील उद्योग व्यवसायासंदर्भाने मुख्यमंत्र्यांनी माहिती दिली.

# कनेक्टिव्हिटीची भरारी

आगामी सिंहस्थाच्या पार्श्वभूमीवर का होईना, मुंबईसह देशभरातील प्रमुख शहरांशी वाढणारी 'कनेक्टिव्हिटी' उत्तर महाराष्ट्राच्या विकासाला बळ देणारी आहे. मागील तीन महिन्यांत केंद्राने भरभरून घोषणा केल्याने आता रस्ते व रेल्वे प्रकल्पांच्या पूर्तीचे मुख्य आव्हान आहे. धर्म-अध्यात्माचा जागतिक उत्सव मानला जात असलेला कुंभमेळा नाशिकचा चेहरामोहरा बदलत असतो, हे कोणी नाकारू शकणार नाही. अर्थात, त्या बदल्यात सोशीक नाशिककरांना बऱ्याच 'कळा' सोसाव्या लागतात. सध्या त्याची साग्रसंगीत अनुभूती येत आहे. खोदकाम, धूळ आणि त्यापायी अभूतपूर्व कोंडीपासून पुढील किमान वर्षभर तरी नागरिकांची सुटका होणे शक्य नाही. या आत्यंतिक वेदना सोसल्यानंतर का होईना, ही कामे दर्जेदार आणि टिकाऊ ठरोत, एवढीच अपेक्षा नाशिककर बाळगून आहेत. मागील कुंभमेळ्यांच्या तुलनेत या खेपेला प्रस्तावित कामे व पैशांचे आकडे कित्येक पटींनी अधिक असले, तरी वेळ मात्र अत्यल्पच असल्याने एकच लगीनघाई सुरू होणे साहजिकच. या उशिराची कारणे पुन:पुन्हा उगाळत बसल्यास त्यास कदाचित नतद्रष्ट ठरवले जाऊ शकते. असो. 'रात्र थोडी, सोंगे फार' अशा परिस्थितीमुळे कामे होवोत न होवोत; परंतु या वेळच्या सिंहस्थानिमित्त लाभणारी दळणवळण साधनांची 'कनेक्टिव्हिटी' ही नाशिकला नव्या उंचीवर घेऊन जाणारी ठरू शकते. महत्त्वाचे म्हणजे, प्रस्तावित पंचवीस हजार कोटींच्या आराखड्यांपलीकडे हजारो कोटींचे रस्ते व रेल्वे प्रकल्प जाहीर करून केंद्र सरकारने महाराष्ट्र आणि त्यातही उत्तर महाराष्ट्रातील जिल्ह्यांवर मेहेरनजर दाखवली आहे. मागील तीन महिन्यांत चार महत्त्वाच्या दळणवळण प्रकल्पांची केवळ घोषणाच झाली नाही, तर प्रत्यक्ष कामालाही सुरुवात झाल्याने जिल्ह्याच्या विकासअनुशेषाच्या कोऱ्या पाटीवर किमान ओरखडे तरी ओढले गेले आहेत. डिसेंबरमध्ये बहुचर्चित सुरत-चेन्नई महामार्गाचा महत्त्वाचा टप्पा असलेल्या नाशिक-सोलापूर-अक्कलकोट या सहापदरी हरितक्षेत्र रस्ते प्रकल्पाला मंजुरी देऊन केंद्राने महाराष्ट्राला नववर्षाची भेट दिली. हा १९ हजार कोटींचा रस्ता पूर्ण झाल्यानंतर तो पुढे राज्याच्या हद्दीबाहेर चारपदरी चेन्नई महामार्गाला जोडला जाईल. त्यामुळे मुंबई व चेन्नई ही देशातील महत्त्वपूर्ण बंदरे थेट जोडली जातील, ज्यात वाढवणही समाविष्ट होणार असल्याने प्रमुख बंदरांचा हा सुवर्णत्रिकोण राज्य व देशाच्या उन्नतीसाठी फलदायी ठरेल. राज्याचे 'किचन' म्हटल्या जाणाऱ्या नाशिकचा कृषीमाल तिन्ही बंदरांपर्यंत भरधाव वेगात पोहोचू शकेल, हेही महत्त्वाचे! तब्बल तीन दशकांहून अधिक काळापासून प्रलंबित असलेल्या मनमाड-इंदूर रेल्वेला चाल देऊन केंद्राने दुसरा सुखद धक्का संपूर्ण उत्तर महाराष्ट्राला दिला. 'देर आये, दुरुस्त आये' या उक्तीप्रमाणे तो पूर्ण होण्याच्या आशा पल्लवित झाल्याने राजधानी मुंबई ते इंदूर हे अंतर सुमारे अडीचशे किलोमीटरने, तर पुणे ते इंदूर अंतर तीनशे किलोमीटरने कमी होईल. महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि केंद्र सरकार मिळून उभारला जात असलेला मनमाड-इंदूर रेल्वेमार्ग विकासाची नवी दिशा दाखवणारा आहे. या रेल्वेमार्गाच्या उपयुक्ततेबद्दल नव्याने काथ्याकूट सुरू झाला असताना, जिल्ह्यासह उत्तर महाराष्ट्राला विकासाचा नवा आयाम दाखविणारे आणखी दोन महत्त्वाचे मार्ग मंजूर करून केंद्राने साऱ्यांनाच आश्चर्यचकित केले. उभारणीच्या टप्प्यात असलेल्या वाढवण बंदराशी नाशिकहून दुसऱ्या बाजूने 'कनेक्ट' होणाऱ्या त्र्यंबक-जव्हार-पालघर या रस्त्याच्या चौपदरीकरणाचा प्रस्ताव अखेर मार्गी लागला. वास्तविक, सिंहस्थ विकास आराखड्यात समाविष्ट असलेला हा रस्ता मागील कुंभमेळ्यापासून चर्चेत होता. मात्र, एका तपाने का होईना, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालील आर्थिक कार्य समितीने त्याची वाट सुकर केली. या प्रकल्पासाठी तत्काळ ३,३२० कोटींचा निधीसुद्धा मंजूर झाल्याने नाशिकहून त्र्यंबक-जव्हारमार्गे पालघर, मुंबई तसेच गुजरातशी सहज 'कनेक्ट' होता येईल. भूसंपादनाच्या तिढ्यामुळे सध्या चर्चेत असलेल्या बाह्य वळण रस्त्याचे महत्त्वाचे टप्पे सुद्धा वर्षभरात पूर्ण करण्यावर सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाचा भर राहील. जमीन मालकांना योग्य मोबदला देण्यासह तांत्रिक बाबींचा निपटारा जेवढा लवकर होईल, तेवढे लवकर प्रकल्प पूर्ण होतील. मनमाड-कसारा या दोन महत्त्वाच्या रेल्वेस्थानकांदरम्यान तिसऱ्या आणि चौथ्या रेल्वेमार्गाच्या प्रकल्पाला केंद्रीय मंत्रिमंडळाने मान्यता दिल्याने या मार्गावरील समस्त प्रवासीवर्ग सुखावला. पूर्व, मध्य आणि पश्चिम भारताच्या जोडणीत या वाढीव रेल्वे मार्गिका मोलाची भूमिका बजावतील, याबद्दल शंका बाळगण्याचे कारण नाही. साधारण दोन दशकांपूर्वी एकट्या मुंबई-आग्रा महामार्गाच्या चौपदरीकरणामुळे नाशिक परिसर मुंबईच्या जवळ गेला. अलीकडे समृद्धी महामार्गाने त्यात मोलाची भर घातली आहे. अशा स्थितीत थेट तिसऱ्या व चौथ्या रेल्वे लाइनचा प्रश्न मार्गी लागल्याने प्रवासी क्षमतेत वाढ होऊन आर्थिक राजधानी मुंबई नाशिकजवळ येणार आहे. तूर्त साडेतीन-चार तासांचा असलेला हा रेल्वे प्रवास अर्ध्या तासाने कमी होणार असला, तरी उद्या मनमाड-नाशिक-कसारा लोकल सेवा वा एखादी सुपरफास्ट गाडी सुरू झाल्यास तो अधिक जलद व सुखावह होऊ शकेल. मध्य रेल्वेच्या मार्गावरील कसारा घाटामुळे मुंबईच्या दिशेने जाताना-येताना रेल्वेला डबल इंजिन लावण्याची प्रक्रिया वेळखाऊ असल्याने या तीस ते चाळीस मिनिटांच्या सक्तीच्या थांब्याचा प्रवाशांना हमखास फटका बसतो. खरे तर मुंबई महामार्गाचे रुंदीकरण झाले, त्याही आधीपासून कसारा आणि मनमाडदरम्यान तिसरा रेल्वेमार्ग टाकण्याची मागणी सातत्याने नाशिकमधील प्रवासीवर्ग, तसेच कृषी व उद्योजक क्षेत्रातील मंडळींकडून केली जात होती. अडीच दशकांनंतर का होईना तिला मूर्त स्वरूप येऊ शकले, हेही नसे थोडके! मधल्या काळात या मार्गावर लोकल सेवेची चाचपणी अनेकदा झाली. परंतु, एकट्या इंजिनाच्या बळावर ही लोकल घाटमाथा चढू शकली नाही. काही वर्षांपूर्वी झालेल्या या सेवेच्या अपयशी चाचण्या अनेकांच्या स्मरणात असतील. काही अभियंते आणि रेल्वे प्रवासी संघटनांनी कसाऱ्यापर्यंत येणारी 'लोकल' नाशिक-मनमाडपर्यंत आणण्यासाठी नेटाने प्रयत्न केल्याने त्यांचाही पाठपुरावा कामी आला. नाशिक-पुणे रेल्वे या मागील तीन दशकांपासून रखडलेल्या प्रकल्पाचेही घोडे सिंहस्थाच्या निमित्ताने दक्षिण गंगेत न्हाले असते तर बरे झाले असते. ही रेल्वे शिर्डीमार्गे नेण्यास विरोध वाढतोच आहे. तूर्तास या प्रस्तावित मार्गबदलावरून नाशिक आणि अहिल्यानगरमध्ये आंदोलनाची जुळवाजुळव सुरू आहे. राजकीय संघर्षाची महत्त्वाची किनार रेल्वेची अलाइन्मेंट बदलाला आहेच. हल्ली ती कुठल्या घडामोडींना नसते? परंतु तुटेपर्यंत ताणण्याची प्रवृत्ती सोडून द्यायला हवी. इतरांना श्रेय मिळेल म्हणून ही रेल्वे धावूच द्यायची नाही, ही काही लोकांची पराकोटीची कोती मानसिकता विभागाच्या मुळावर उठणारी आहे. हवाई संपर्काबाबतही इतकी वर्षे नाशिकला सापत्नभावाची वागणूक मिळाली. अलीकडच्या वर्षांत श्री साईबाबांच्या शिर्डीतील विमानतळाला नाइट लँडिंगपासून ते प्रत्येक गोष्टीत झुकते माप मिळाल्याने त्याच्या कित्येक वर्षे आधीपासून असलेल्या ओझर विमानतळाकडे मात्र राज्यकर्त्यांनी दुर्लक्ष केले.

# मायबोलीत बोलू या! चला मराठीतच बोलू या!!

मराठी भाषा हजारो वर्षांच्या इतिहासाने समृद्ध आहे. ही भाषा केवळ संवादाचे साधन नाही, तर आपल्या संस्कृतीचे, ऐतिहासिक परंपरेचे आणि सृजनशीलतेचे जिवंत प्रतीक आहे. 'माय मराठी' या संकल्पनेत तिचे शुद्ध, प्रमाण आणि अभिजात रूप जितके महत्त्वाचे आहे, तितकेच विविध उपभाषांनी वाढवलेले तिचे वैविध्यही महत्त्वाचे आहे.



मराठी ही उपभाषांनी समृद्ध झालेली भारतातील एक प्रमुख भाषा आहे.मातृभाषा आपले अस्तित्व असते. बोलीभाषा माणसाची अस्मिता असते. प्रत्येक बोलीत तिचा वेगळा रंग, वेगळी लय आणि वेगळे चैतन्य तसेच लोकजीवनाचे प्रतिबिंब सामावलेले आहे. त्यामुळे मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना जगातील एका अभिमानास्पद भाषेला आपण 'माय मराठी' म्हणतो, याचा आत्मीय अभिमान बाळगण्याचा हा दिवस आहे.

हा दिवस प्रत्येक मराठी माणसाने व्यवहारात, शिक्षणात, प्रशासनात, माध्यमांमध्ये आणि दैनंदिन संभाषणात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याचा संकल्प करण्याचा आहे.

**मराठी भाषा गौरव दिन : २७ फेब्रुवारी**

वि. वा. शिरवाडकर उपाख्य कुसुमाग्रज यांच्या जन्मदिनी, म्हणजेच २७ फेब्रुवारीला मराठी भाषा गौरव दिन साजरा केला जातो. मराठी साहित्य आणि भाषेच्या समृद्धीसाठी त्यांनी केलेल्या कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस साजरा केला जातो.

२१ जानेवारी २०१३ रोजी मराठी भाषा विभागाने अधिकृतपणे या दिनाची घोषणा केली. तसेच ३ ऑक्टोबर रोजी राज्यात 'अभिजात मराठी भाषा दिन' साजरा केला जातो. तर दरवर्षी माजी राष्ट्रपती दिवंगत डॉ. ए.पी.जे.अब्दुल कलाम यांच्या जयंतनिमित्त १५ ऑक्टोबरला वाचन प्रेरणा दिन साजरा केला जातो. राज्यभरात वाचन संस्कृतीला प्रोत्साहन देण्यासाठी विविध कार्यक्रम, वाचन उपक्रम आणि शैक्षणिक कार्यक्रम आयोजित केले जातात. या दोन्ही दिवसांत राज्यभर विविध साहित्यिक, सांस्कृतिक आणि शैक्षणिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते.

मराठी भाषेचा गौरव करण्याबरोबरच तिच्या संवर्धनासाठी आणि विस्तारासाठी चिंतन करण्याची ही संधी असते. चला, यावर्षी मराठी भाषा गौरव दिन साजरा करताना मराठीला समृद्ध करणाऱ्या उपभाषांचा वाटा समजून घेऊया.

**विविध उपभाषांचा समृद्ध वारसा**

महाराष्ट्रात विविध बोलीभाषांचा विपुल वापर आढळतो. नाथ, महानुभाव आणि वारकरी संत परंपरेतील संतांनी प्राचीन काळापासून विविध बोलींचा वापर करून मराठी भाषेला अधिक व्यापक केले. आपण सर्वांनी आपल्या बालपणी चिमणी आणि कावळ्याची गोष्ट ऐकली आहेतुम्हाला माहिती आहे, श्री चक्रधर स्वामींनी ही गोष्ट आठशे वर्षांपूर्वी रुसलेल्या एका मुलीला सांगितल्याची नोंद लीळाचरित्रात आहे. कविश्रेष्ठ कालिदास, शूद्रक यांच्या शाकुंतल, मृच्छकटिक या नाटकांमध्ये अनेक संवाद मराठी बोली भाषेत आहेत.

वऱ्हाडी, अहिराणी, कोकणी, मालवणी, कोल्हापुरी, मराठवाडी, नागपुरी, झाडीबोली, खानदेशी, गोंडी, बंजारा, कोलामी अशा असंख्य उपभाषा मराठीच्या समृद्ध परंपरेचा भाग आहेत. प्रत्येक उपभाषेला स्वतंत्र ऐतिहासिक व सांस्कृतिक पार्श्वभूमी आहे. जशा अनेक उपनद्या मिळून नदी अधिक विशाल आणि समृद्ध होते, तशाच या उपभाषांनी मराठी भाषेला गोडवा, विस्तार आणि ऊर्जा दिली आहे. उदाहरणार्थ, वऱ्हाडी ही अत्यंत प्रभावी उपभाषा आहे. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या 'ग्रामगीता' मध्ये वऱ्हाडी भाषेचा प्रभावी वापर दिसतो. त्यांनी संपूर्ण गावगाडाच मराठीत मांडला आहे.तसेच संत गाडगेबाबा यांच्या कीर्तनांमधूनही वऱ्हाडीचा सहज आणि प्रभावी उपयोग आढळतो. आचार्य प्र.के.अत्रे यांनी गाडगेबाबांच्या वऱ्हाडी संबोधनाचे जाहीर कौतुक केले आहे.

कोकणी व मालवणी बोली त्यांच्या खास गोडव्यासाठी ओळखल्या जातात, तर कोल्हापुरी बोली तिच्या रांगड्या ठसक्यासाठी प्रसिद्ध आहे. झाडीबोली आणि गोंडी भाषेच्या प्रभावामुळे महाराष्ट्राच्या आदिवासी संस्कृतीचा समृद्ध वारसा जतन झाला आहे. झाडीबोलीतील नाटकांची परंपरा महाराष्ट्राला ज्ञात आहे. खानदेशी आणि अहिराणी भाषेचा गोडवा बहिणाबाई चौधरी यांच्या काव्यातून प्रत्ययास येतो.

उपभाषांवर प्रादेशिक प्रभाव असतो. उदाहरणार्थ, कोकणी मराठीवर कन्नडचा प्रभाव जाणवतो. 'अक्का' हा मोठ्या बहिणीसाठी वापरला जाणारा गोड शब्द कन्नड-तेलुगू भाषांमधून मराठीत रूढ झाला आहे. वऱ्हाडीमध्ये, झाडीबोलीत हिंदीचे, तर अहिराणीमध्ये गुजरातीचे अनेक शब्द सहजपणे मिसळलेले दिसतात. खरे तर हीच भाषेची खरी ताकद आहेस्वीकारण्याची आणि समृद्ध होण्याची!

**मराठी भाषेचे संवर्धन आणि विकास**

उपभाषांनी मराठीला अधिक व्यापक आणि अभिव्यक्तिपूर्ण बनवले आहे. राज्य शासनाने मराठी भाषा गौरव दिनानिमित्त मराठी भाषा संवर्धक, अभ्यासक, संशोधक, लेखक आणि साहित्यिक यांचा सन्मान करण्याचे निर्देश दिले आहेत.

भाषाविषयक स्पर्धा, परिसंवाद, व्याख्याने आणि चर्चासत्रे आयोजित केली जातात. विविध शासकीय कार्यालयांमध्ये त्रिभाषा सूत्राचा प्रभावी वापर करण्यावर भर दिला जात आहे. मराठीचा प्रशासनिक, शैक्षणिक आणि सामाजिक वापर वाढवणे ही काळाची गरज आहे.

शासन प्रयत्नशील आहेच; परंतु, सर्वसामान्यांचा सक्रिय सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे. विद्यार्थ्यांनी विविध बोलीभाषांचा अभ्यास करून त्यांचा अभिमान बाळगला पाहिजे. भाषेचे संवर्धन हे केवळ धोरणातून नाही, तर व्यवहारातून होते.

**मराठीचा वापर वाढवू या!**

'उपभाषांनी समृद्ध झालेली माय मराठी' हा विचार मराठीच्या सर्वांगसुंदरतेची जाणीव करून देतो. भाषा ही आईसारखी असतेविशाल, सामावून घेणारी आणि ममत्वाने ओथंबलेली.

महाराष्ट्रात येणारा कोणताही व्यक्ती या भाषेचा गोडवा अनुभवतो आणि सोबत घेऊन जातो. 'तुम्हाला मराठी येते म्हणजे तुम्ही मराठी आहात' हा या भाषेचा उदात्त बाणा आहे.

त्यामुळे आज मराठी भाषा गौरव दिनाला जागतिक स्तरावर मराठीचा सन्मान टिकवण्यासाठी आम्ही सर्वांनी प्रयत्न करणे गरजेचे आहे यासाठी..

मराठी माध्यमातील शिक्षणाचा प्रसार
मराठी शाळांचे अस्तित्व टिकवणे
आधुनिक माध्यमांवर मराठीत अभिव्यक्त होणे
दैनंदिन व्यवहारात मराठीचा जाणीवपूर्वक वापर
ही अत्यावश्यक पावले आहेत.

दिवंगत कवीवर्य डॉ. मिर्झा रफी अहमद बेग यांनी मराठीच्या सामर्थ्याचे सुंदर वर्णन केले आहे

मराठीची प्रतिभा, ज्ञानेश्वरीत समावते
ग्रामगीता गाथाही, मराठीतच मावते
लावणीतून मराठीचे, सौंदर्य ओसंडते
शौर्य आणि औदार्य, पोवाड्यातून सांडते
मराठीनेच तुकड्याला तुकडोजी केले
गाडगेबाबा मराठीतच जन्म घेऊन गेले
अमृताशी पैज जिंकते, मराठी बोली
आभाळाची उंची जिच्यात, समुद्राची खोली
साऱ्यांनी मराठी हुंकारावर डोलावे
मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलावे..!

चला मराठी भाषा गौरव दिनानिमित्त आपण सर्वांनी एक संकल्प करूया, मराठी माणसाने मराठी माणसाशी मराठीतच बोलूया..!

**– प्रवीण टाके,**
उपसंचालक (माहिती),
विभागीय माहिती कार्यालय,
कोल्हापूर ९७०२८५८७७७

# गडचिरोलीत नक्षलवाद्यांची स्मारके उद्ध्वस्त...

गडचिरोली जिल्ह्यात केंद्रीय राखीव पोलीस दल आणि गडचिरोली जिल्हा पोलीस यांच्या संयुक्त कारवाईत ४४ माओवादी स्मारके उद्ध्वस्त करण्यात आलेली आहेत. यात ८०० जवानांनी भाग घेतला आणि ही कारवाई पार पाडली आहे. त्यामुळे आता या जिल्ह्यातला नक्षलवाद शेवटचे आचके देतो आहे, असे म्हटल्यास चुकीचे ठरणार नाही. इथला नक्षलवाद समूळ संपला, तर तिथे विकासाची नवी पहाट होईल यात कोणती शंका नाही.

महाराष्ट्र राज्य माध्यमिक आणि उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ, पुणे यांच्या वतीने बारावीची परीक्षा १० फेब्रुवारी, तर दहावीची परीक्षा २० फेब्रुवारीपासून राज्यात सुरू झाली आहे. या परीक्षा पुणे, मुंबई, अमरावती, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, नाशिक, लातूर, कोल्हापूर व कोकण अशा ९ विभागीय मंडळांच्या मदतीने घेत असतात. बारावीच्या परीक्षेत आतापर्यंत १०९ गैरप्रकार झाले असून कोकण विभागीय मंडळामध्ये एकही गैरप्रकार झालेला नाही. तेव्हा परीक्षा मंडळाने अधिक दक्ष राहणे आवश्यक आहे. दोन्ही परीक्षा मुलांच्या करिअरच्या दृष्टीने अतिशय महत्त्वाच्या आहेत. पालकांनी मुलांच्या तणावाच्या लक्षणाकडे बारकाईने लक्ष द्यायला हवे. म्हणजे त्यांना परीक्षाकाळात तणावमुक्त परीक्षा देता येईल. त्यासाठी पालकांनी परीक्षेच्या कार्यकाळात परीक्षा सुरू असताना मुलांची काळजी घेणे आवश्यक आहे.

परीक्षेचे वेळापत्रक जसजसे जवळ येते तसतसे मुलांचा ताण वाढण्याला मदत होत असते. जी मुले नियमित अभ्यास करतात त्यांना कोणत्याही प्रकारचा ताण जाणवत नाही. तेव्हा आई-वडिलांनी मुलांची केवळ परीक्षेपुरती काळजी न घेता नियमितपणे काळजी घेतली पाहिजे. बऱ्याच वेळा परीक्षा जवळ आली की मुलांची डोकेदुखी, पोटदुखी, अंगदुखी, झोप न येणे, मूल चिडचिडे होणे असे दिसून येते. अशा वेळी पालकांनी मुलांना विश्वासात घेऊन सकारात्मक दृष्टिकोन मुलांबरोबर ठेवावा. याचा परिणाम म्हणून त्यांना प्रोत्साहन मिळून ती अधिक जोमाने अभ्यास करून तणावमुक्त होऊन परीक्षेला आनंदाने सामोरे जातील. पालकांनी आपली मुले परीक्षेत यशवंत होण्यासाठी परीक्षेच्या कालावधीत मुलांच्या मनात तणाव वाढणार नाही याची काळजी घ्यावी. तेव्हा मुलांच्या अभ्यासातील प्रगतीचा भूतकाळ कसा होता किंवा त्यांनी काय केले याची उजळणी न करता त्यांच्या भविष्याचा विचार करून त्यांच्याशी सुसंवाद साधावा. मुलांच्या परीक्षेविषयी त्यांच्या मनातील भीती दूर करावी. त्यांना आनंदित ठेवावे. पालकांनी अभ्यासासाठी जास्त सक्ती करू नये. मुलांनासुद्धा आपल्या परीने अभ्यास करू द्यावा. तेव्हा आपल्यावरती आता धाक नाही असे मुलांनी न समजता अभ्यासाकडे दुर्लक्ष करू नये. यात आपलेच नुकसान होणार आहे, याची मुलांनी दक्षता घ्यावी. यासाठी मुलांनी आज्ञाधारक राहिले पाहिजे.

महत्त्वाची बाब म्हणजे, आपले मूल परीक्षेच्या काळात पुरेसे जेवण करीत आहे का? याकडे सुद्धा पालकांनी लक्ष द्यायला हवे. मुलांची बौद्धिक क्षमता वाढण्यासाठी त्यांचे आरोग्य चांगले असावे लागते. त्यासाठी त्यांना संतुलित आहार नियमित मिळणे आवश्यक आहे. म्हणजे त्यांची ऊर्जा टिकून राहते. परीक्षा काळात मुलांच्या जेवणात बदल करू नये. तसेच त्यांना पुरेशी झोप घेण्यास सहकार्य करावे. मुलांना पुरेशी झोप मिळाल्यामुळे ते अधिक एकाग्रतेने अभ्यास करू शकतात. त्यात टीव्ही पाहणे आणि आरोग्यासाठी व्यायाम अतिशय महत्त्वाचा असतो. काही पालक रात्रभर अभ्यास करा असे मुलांना सांगत असतात किंवा अभ्यासिकेत पाठविले जाते. अशा वेळी पालकांनी सुद्धा मुलांचा कल लक्षात घेणे गरजेचे असते. कारण इतरांपेक्षा आपल्या मुलांच्या आवडीनिवडी पालकांना जास्त माहिती असतात. अभ्यासाबरोबर आरामाचीसुद्धा मुलांना नितांत आवश्यकता असते. याकडे सुद्धा पालकांनी अधिक लक्ष द्यायला हवे. याचा जास्त फायदा आपल्या मुलांना होत असतो. याची कल्पना पालकांना असायला हवी. अभ्यासाबरोबर घराचीसुद्धा स्वच्छता जास्त महत्त्वाची असते. त्याचबरोबर पालकांनी स्वत: शांत राहणे महत्त्वाचे असते. परीक्षा काय दररोज होत नाहीत. मात्र परीक्षेचा काळ मुलांप्रमाणे पालकांसाठीही महत्त्वाचा असतो. या कार्यकाळात मुलांना तणावमुक्त होण्यासाठी तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन अतिशय महत्त्वाचे असते, मात्र यात जास्त वेळ घालवू नये. मुलांच्या अभ्यासासाठी कशी मदत होईल त्या दृष्टीने प्रयत्न करावा. यात जास्त वेळ घालवू नये. परीक्षेच्या काळात मुलांचा ताण वाढल्यास मुलांनी त्याचा सामना कसा करावा याचा योग्य सल्ला घ्यावा. या काळात मुलांना अभ्यास करताना व्यत्यय येणार नाही याची पालकांनी काळजी घ्यावी. आरामात अभ्यास करेल अशा जागेत त्याला अभ्यास करण्यासाठी बसवावे. परीक्षा सुरू असल्याने आपल्या मुलांना प्रेरित करण्यासाठी प्रोत्साहित करावे. विद्यार्थी आणि परीक्षा यांचा कसा सबंध असतो. परीक्षा चांगल्या गुणांनी उत्तीर्ण झाल्यावर आपले ध्येय सहज पार करू शकतो याची आठवण मुलांना करून द्यावी. काही वेळा परीक्षा काळात मुलांना चिंताग्रस्त होणे साहजिकच आहे. मात्र सकारात्मक दृष्टिकोन मुलांनी ठेवायला पाहिजे. ही नैसर्गिक प्रतिक्रिया असून त्यावर सहज मात करता आली पाहिजे. यासाठी वर्षभरात झालेला अभ्यास दरदिवशी करणे आवश्यक आहे. अभ्यास झाला असेल तर त्याकडे दुर्लक्ष न करता अधूनमधून अभ्यासाचे वेळापत्रक तयार करून अभ्यास करावा. म्हणजे त्या अभ्यासक्रमाची उजळणी होऊन मुलांच्या मनात तणाव निर्माण होत नाही. यात अभ्यासात चुकारपणा मुलांनी करू नये. अभ्यासासाठी मुलांवर दबाव वाढवू नये तर मुलांच्या समस्या सुद्धा पालकांनी समजून घेणे गरजेचे असते. परीक्षा झाल्यावर पेपरमध्ये कठीण प्रश्न कोणते होते? किती लिहिलाय? पेपर पूर्ण लिहिलाय काय? असे अनेक प्रश्न विचारत बसण्यापेक्षा आता पुढील परीक्षा कोणत्या विषयाची आहे. त्या विषयावर लक्ष केंद्रित करण्यासाठी प्रोत्साहन द्यावे. परीक्षेला घरातून जाताना मुलांना आधार दिला पाहिजे. तसेच त्यांना धीर द्यावा म्हणजे मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त परीक्षा देऊ शकतात. तेव्हा मुले परीक्षेच्या काळात तणावमुक्त होण्यासाठी पालकांनी प्रोत्साहन द्यावे.

***

# मराठी भाषा दिन : अभिव्यक्तीचा उत्सव

आपली भाषा ही अभिजात मराठी म्हणून मान्य झाली आहे. अमृतातेही पैजा जिंकणारी आपली ही मातृभाषा आणि ही भाषा बोलण्याचा सार्थ अभिमान आपण बाळगत आहोत कोणत्याही भाषेत असणारे शब्द स्वीकारण्याची आणि त्यानुरूप उत्क्रांत होण्याची क्षमता असल्यामुळे आपली मराठी समृद्ध आणि संपन्न होत आहे, याचाही सार्थ अभिमान आपणास हवा.

दरवर्षी २७ फेब्रुवारी हा दिवस महाराष्ट्रात ''मराठी भाषा दिन'' म्हणून साजरा केला जातो. ज्येष्ठ कवी वसंत बापट यांच्या शब्दांत सांगायचे झाले तर भाषा ही केवळ संवादाचे साधन नसून ती संस्कृतीची, इतिहासाची आणि अस्मितेची वाहक असते. २७ फेब्रुवारी हा कविवर्य कुसुमाग्रज (वि. वा. शिरवाडकर) यांचा जन्मदिन. त्यांच्या साहित्यिक कार्याच्या स्मरणार्थ हा दिवस मराठी भाषा दिन म्हणून साजरा केला जातो.

**मराठी भाषेचा समृद्ध वारसा**

मराठी ही इंडो-आर्यन भाषासमूहातील एक प्रमुख भाषा असून तिचा इतिहास सुमारे एक हजार वर्षांहून अधिक जुना आहे. संत ज्ञानेश्वर, संत तुकाराम, नामदेव, एकनाथ यांच्या अभंग-ओव्यांनी मराठीला अध्यात्मिक उंची दिली. पुढे शाहिरी परंपरा, पोवाडे, भारुडे, कीर्तन या माध्यमांतून मराठी जनमानसात रुजली.

छत्रपती शिवाजी महाराजांच्या काळात मराठी प्रशासनाची भाषा बनली. राजकारभारात, किल्ल्यांवरील पत्रव्यवहारात आणि शासननिर्णयांत मराठीचा प्रभावी वापर होत असे. त्यामुळे मराठीला स्वाभिमानाचे आणि स्वराज्याचे प्रतीक मानले जाते.

**साहित्य, पत्रकारिता आणि आधुनिक मराठी**

लोकमान्य टिळकांनी 'केसरी'सारख्या वृत्तपत्रातून मराठी पत्रकारितेला बळ दिले. पुढे प्र. के. अत्रे, पु. ल. देशपांडे, व. पु. काळे, विंदा करंदीकर, कुसुमाग्रज अशा अनेक साहित्यिकांनी मराठी साहित्य समृद्ध केले. कादंबरी, कथा, कविता, नाटक, चित्रपट, दूरदर्शन, रेडिओ आणि आता डिजिटल माध्यमांमुळे मराठीची अभिव्यक्ती अधिक व्यापक झाली आहे.

आज मराठी भाषा विज्ञान, तंत्रज्ञान, प्रशासन, शिक्षण आणि सामाजिक माध्यमांमध्येही प्रभावीपणे वापरली जात आहे. मराठी विकिपीडिया, ब्लॉग्स, यूट्यूब, पॉडकास्ट या माध्यमांतून नव्या पिढीला मराठीची ओढ निर्माण होत आहे.

**भाषा जपणे काळाची गरज**

जागतिकीकरणाच्या युगात इंग्रजी आणि इतर भाषांचा प्रभाव वाढत असला तरी मातृभाषेचे महत्त्व कमी होत नाही. मातृभाषेतून शिक्षण घेतल्यास विचारांची मांडणी स्पष्ट होते, सर्जनशीलता वाढते आणि संस्कार दृढ होतात.

मराठी भाषा दिन हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, दैनंदिन जीवनात मराठीचा जाणीवपूर्वक वापर करण्याची शपथ घेण्याचा दिवस असावा. घरात, कार्यालयात, शाळेत आणि सार्वजनिक व्यवहारात मराठीचा सन्मानपूर्वक वापर करणे ही प्रत्येकाची जबाबदारी आहे.

मराठी ही केवळ भाषा नाही, तर ती आपली ओळख आहे, संस्कृती आहे, आत्म्याचा आवाज आहे. ''जय जय महाराष्ट्र माझा'' म्हणताना ज्या अभिमानाची भावना जागते, तीच भावना मराठी भाषा दिनाच्या निमित्ताने अधिक दृढ व्हावी. चला, मराठी भाषा दिनी आपण सर्वांनी मराठीचा गौरव करूया, तिचे संवर्धन करूया आणि पुढील पिढ्यांसाठी हा अमूल्य ठेवा जपूया.

मराठी माझी मायबोली
मराठी माझा बाणा
मराठी माझा अभिमान!

**– प्रशांत दैठणकर**
प्रभारी उपसंचालक
(माहिती)
विभागीय माहिती कार्यालय
छत्रपती संभाजीनगर

# गोपनिय माहीतीवरुन पोलीसांनी केली खोट्या नोटा देवुन फसवणुक करणारी टोळी अटक

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** दिनांक २५/०२/२०२६ रोजी सायंकाळी ०६.०० वाजता गुप्तमाहीतीदारे माहीती मिळाली की, भारतीय बच्चों का बैंक लिहीलेल्या खोट्या नोटा देवुन फसवणुक करणारी टोळी पोलीस स्टेशन बासंबा हद्दीत आली आहे. व ते दि.२५/०२/२०२६ रोजी रात्री ०९.०० ते ०९.३० वाजता चे सुमारास हिंगोली ते वाशिम रोडवरील अशोका हॉटेल जवळ येणार आहेत अशी गोपनीय माहीती मिळाल्यावरुन आम्ही सावळा रचला असता यातील आरोपी यास संशय आल्याने त्यांनी यातील फिर्यादीस तु कन्हेरगाव नाका येथील पुलाखाली या तुला पैसे देतो असे सांगीतले तेथे फिर्यादीकडुन आरोपीने १ लाख रुपयाच्या ख-या (ओरीजनल) नोटा घेवून फिर्यादीस दोन लाख पन्नास हजार रुपयाच्या भारतीय बच्चों का बैंक असे लिहलेले ५०० रु दराचा नोटा देवुन आम्हाला पाहुन टोलनाक्याकडे पळून गेले. आम्ही टोलनाका येथे पोलीस अंमलदार नेमुन तेथे नाकाबंदी केली. असता ते तेथुन गाडी पलटवुन राजगावच्या दिशेने निघाले त्यानंतर ते चिंचपुरी बॅरेचकडे गेले असता आम्ही तेथे रोडवर ट्रक्टर आडवे लावुन नाकाबंदी केल्याने ते चिचंपुरी गावात येते असतांना आमची गाडी त्याचे गाडीसमोर लावुन ते त्यांची गाडी सोडुन पळून जात असतांना आम्ही त्याचा पाटलाग करुन त्यांना पकडले. आरोपी इसम नामे क्र. १) लखन गोपाल बजाज वय ३६ वर्षे रा. घाटपुरी नाका ता. खामगाव जि. बुलढाणा २) विजय प्रकाशसिंग ठाकुर वय ४२ वर्षे रा. शेगावनाका ता. खामगाव जि. बुलढाणा यांचेकडुन खालील वर्णनाचा मुद्देमाल जप्त केला.

१) ५०,००००/– आरोपी क्रमांक लखन गोपाल बजाज यांचे ताब्यातुन १) एक वन प्लस कंपनीचा मोबाईल जु.वा.किं. अं.४०,००००/– रुपये २) एक मोटो जि. ४५ कंपनीचा मोबाईल जु.वा.किं.अ. १०,०००/– रुपये ३) भारतीय बच्चौ का बैंक असे ५०० रुपये दराचे २ खोटे बंडल प्रत्येकी बंडलामध्ये १०० नोटा या प्रमाणे कि. अं. ००.०० रुपये

२) ५५,०००/– आरोपी विजय प्रकाशसिंग ठाकुर यांचे ताब्यातुन १) गुगल फिक्सल कंपनीचा मोबाईल जु. वा.कि.अ.५०,०००/– रुपेय २) विवो कंपनीचा मोबाईल जु.वा. कि.अं. २०,०००/– रुपये ३) भारतीय बच्ची का बैंक असे ५०० रुपये दराचे २ खोटे बंडल प्रत्येकी बंडलामध्ये १०० नोटा या प्रमाणे कि.अं. ००.०० रुपये अस ३) एक किया कंपनीची ग्रे रंगाची चारचाकी मोटार गाडी जिचा

आर.टी.ओ.क्र.एम.एच. १५ २२४८ जु.वा. किं.अं. १२,००,०००/– रुपये ४) ००.००/– भारतीय बच्चो का बैंक असे लिहलेले ५०० रु दराचे खोटे प्रत्येकी ०९ बंडल मिळुन आले. असा एकुण १३,२०,०००/– रुपयाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. यातील आरोपी विरुद्ध कलम ३१८(४), ३३६(३), ३(५) भा. न्या. संहीता प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला असुन आरोपीस अटक करण्यात आली आहे.

सदरची कारवाई पोलीस अधिक्षक डॉ.निलाभ रोहन ,अप्पर पोलीस अधिक्षक कमलेश मिना हिंगोली, कुंदनकुमार वाघमारे , उपविभागीय पोलीस अधिकारी हिंगोली शहर, यांचे मार्गदर्शनात स.पो.नी विकास आडे प्रभारी अधिकारी पोलीस स्टेशन बासंबा




ता. जि. हिंगोली यांचे नेतृत्वात ग्रे.पो. उप.नी. मदन गव्हाणे सा. पोह/५३९ पोले, पोह/११६ भडके, पोह/९६५ पोले, पोह/४८, पोशी/१४८ हाके, पोशी/६५० गुंजकर, पोशी/७६९ क–हाळे, पोशी/११७ शेख, पोशी/२५० इंगोले, पोशी/९५६ मस्के, होमगार्ड सैनिक २६८६/ शेख, २५२२/ठेंगडे, २८१७/गोरे, २४५५/पठाण, २३६५/ राउत यांनी केली. अशी माहिती बासंबा पोलीस ठाण्याचे स.पो.नी विकास आडे यांनी दिली आहे.




# पवार पब्लिक स्कूलचे नॅशनल सायन्स ऑलिंपियाड परीक्षेमध्ये घवघवीत यश

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** शहरातील अंबिका नगर येथील पवार पब्लिक स्कूल मधील विद्यार्थ्यांनी नॅशनल सायन्स ओलंपियाड परीक्षेमध्ये यश संपादन केले. इयत्ता पहिली ते सातवी मधील विद्यार्थ्यांनी या परीक्षेमध्ये सहभाग नोंदविला होता त्यामधून पंधरा विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल संपादन केले. यावेळी शाळेचे संचालक प्रणव पवार यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना गोल्ड मेडल व सर्टिफिकेट देऊन गौरवण्यात आले.

यावेळी शाळेचे शिक्षक वृंद मध्ये कोमल अग्रवाल, सचिन धामणे, सॉली केसी, जॉबीन जॉर्ज, योगेश थोरात, अपर्णा जामकर, दीपाली राऊत, अश्विनी बोराळकर, पंकज इंगोले, फिजा सय्यद, दिपाली मुदिराज, रुपाली ठाकरे, छाया धनवे, सचिन इंगोले, गजानन वानरे, कपिल मस्के, संतोष पाईकराव, वैभव काळे, विकास महानोर, आदींची उपस्थिती होती.

# धुळीवंदन चंद्रग्रहण वेध पाळावे लागणार–ज्योतिषाचार्य लक्ष्मीकांत पाठक

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** खग्रास चंद्रग्रहण (ग्रस्तोदित) फाल्गुन शु. १५, मंगळवार, ३ मार्च २०२६.ग्रहण स्पर्श ३ वाजुन २० मिनीटांनी होणार आहे,संमोलन ४ वाजून ३४ मिनीटे,मध्य ५ वाजून ०४ मिनीटे उन्मोलन ५ वाजून३३ मिनीटे व मोक्ष ६ वाजून ४८ मिनिटांनी होणार आहे.

ग्रहण ग्रस्तोदित दिसणार आहे. म्हणजे ग्रस्त असलेले चंद्रबिंब उदयास आलेले दिसेल.

पुण्यकाल – चंद्रोदयापासून (आपल्या गावाच्या सूर्यास्त पासून) ग्रहण मोक्षापर्यंत अल्पकाळ पुण्यकाल आहे.

काम नियम पाळावे

वेधारंभ – हे ग्रहण ग्रस्तोदित असल्याने ३ मार्च २०२६ मंगळवारी सूर्योदयापासून मोक्षापर्यंत (सायंकाळी ६:४८ पर्यंत) ग्रहणाचे वेध पाळावेत. बाल, वृध्द, आजारी अशक्त आणि गर्भवतींनी मंगळवारी सकाळी ११ पासून मोक्षापर्यन वेध पाळावेत. वेधकाळात स्नान, देवपूजा, जप, श्राद्ध, नित्यकर्म ग्रहणाचे वेध पाळावेत. वेधामध्ये भोजन निषेध आहे म्हणून अन्नपदार्थ खाऊ नयेत. मात्र वेधकाळात इतर आवश्यक असे पाणी पिणे मलमूत्रोत्सर्ग करणे, झोप घेणे ही कर्म करता येतात. ग्रहण काळात म्हणजे आपल्या गावाच्या सूर्यास्तापासून मोक्षापर्यंत (सायंकाळी ६:४८) या काळात पाणी पिणे. मलमुत्रोत्सर्ग करु नयेत.

ग्रहणातील कृत्ये: सूर्यास्त होताच स्नान करावे. पर्वकाळात देवपूजा, तर्पण, श्राद्ध, जप, होम, दान यापैकी जे शक्य असेल ते करावे, पर्वी घेतलेल्या मंत्राचे पुरश्चरण चंद्रग्रहणात करावे. ग्रहण मोक्षानंतर स्नान करावे. अशौच असता ग्रहणकालात ग्रहणासंबधीस्नान, दान करण्यापुरती शुद्धी असते,,




ग्रहणाचे राशिपरत्वे फल मिथुन, तुला, वृश्चिक, मीन या राशीना शुभफल मेष, कर्क, धन, कुंभ या राशीना मिश्रफल वृषभ, सिंह, कन्या, मकर या राशीना अनिष्ट फल आहे. ज्या राशीना अनिष्ट फल आहे त्या राशीच्या व्यक्तींनी आणि गर्भवतीनी ग्रहण पाहू नये.

तसेच होळी २ मार्चला करावी.

हुताशनी पौर्णिमा (होळी)

यावर्षी दि. २ मार्च २०२६ रोजी सोमवारी फाल्गुन शु. चतुर्दशी समाप्ति १७:५६ असून त्यानंतर प्रदोषकाळात पौणिमा आहे आणि दूसरे दिवशी ३ मार्च रोजी पौर्णिमा १७:०८ पर्यंत आहे.

शास्त्रवचनानुसार होलिका दहन २ मार्च रोजी आहे. मात्र ज्या ३ मार्च रोजी पौर्णिमा साडेतीन प्रहरापेक्षा कमी असलेल्या प्रदेशात ३ मार्च रोजी मंगळवारी साडेतीन प्रहरापेक्षा अधिक पौर्णिमा आहे आणि प्रतिपदा वृद्धिगामी आहे, त्या प्रदेशात सुद्धा होलिका दहन ३ मार्च ऐवजी २ मार्च रोजी आहे. कारण ३ मार्च रोजी ग्रस्तोदित चंद्रग्रहण असून ग्रहणकाल आणि प्रदोषकाल सुरु होण्यापूर्वी पौणिमा समाप्त होत आहे. म्हणून धर्मसिंधु मधील विशेष वचनानुसार होलिका दहन २ मार्च २०२६ रोजी दिलेले आहे, २ मार्च रोजी सोमवारी ४ :५६ ते ५:२९ संपूर्ण रात्र भद्रा आहे, मात्र अशा वेळेस प्रदोषकाळात भद्रा असताना सुद्धा २ मार्च रोजी होलिका दहन करता येते अशी माहिती ज्योतीषाचार्य लक्ष्मीकांत पाठक यांनी दिली आहे.



# वक्तृत्वाच्या व्यासपीठावर शांताबाई दराडे विद्यालयाची दैदिप्यमान झेप

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** भारतीय विद्या मंदिर शिक्षण संस्था संचलित श्रीमती शांताबाई मुंजाजी दराडे माध्यमिक विद्यालय, हिंगोली येथील विद्यार्थ्यांनी शिवजयंती महोत्सव समिती आयोजित वक्तृत्व स्पर्धेत उल्लेखनीय यश संपादन करत विद्यालयाच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे.

या स्पर्धेत इयत्ता नववीचा विद्यार्थी हनुमान गजानन जाधव याने आपल्या प्रभावी, अभ्यासपूर्ण आणि ओजस्वी वक्तृत्वाच्या जोरावर प्रथम क्रमांक पटकावला. तसेच कुमारी अंबिका जाधव हिने उत्कृष्ट सादरीकरणातून तृतीय क्रमांक मिळवला. याच विद्यालयाची विद्यार्थिनी सृष्टी हरिदास वायचाळ हिला प्रोत्साहनपर पारितोषिक देऊन गौरविण्यात आले.

या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा विद्यालयात विशेष सत्कार समारंभ आयोजित करण्यात आला. हिंगोली शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे यांच्या हस्ते विद्यार्थ्यांचा पुष्पहार व सन्मानचिन्ह देऊन गौरव करण्यात आला.

समारंभाच्या अध्यक्षस्थानी विद्यालयाचे मुख्याध्यापक तथा हिंगोली जिल्हा मुख्याध्यापक संघाचे अध्यक्ष डॉ. प्रकाश अंभोरे होते. आपल्या अध्यक्षीय भाषणात त्यांनी विद्यार्थ्यांच्या यशाबद्दल अभिमान व्यक्त करत सांगितले की, ''वक्तृत्व ही केवळ स्पर्धा नसून व्यक्तिमत्त्व विकासाची प्रभावी शिदोरी आहे. अशा स्पर्धांमुळे विद्यार्थ्यांमध्ये आत्मविश्वास, अभ्यासाची सखोलता आणि नेतृत्वगुण विकसित होतात.''

संस्थेचे अध्यक्ष प्रा. मदन मार्डीकर, सचिव ॲड. गयबाराव नाईक तसेच सर्व सन्माननीय संचालक मंडळाने यशस्वी विद्यार्थ्यांचे अभिनंदन करून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अध्यापक संजय कुलकर्णी यांनी प्रभावीपणे केले. उपमुख्याध्यापक अनिल लोळेवार, पर्यवेक्षक भारत शिंदे, शिक्षकवृंद, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. विद्यार्थ्यांच्या या यशामुळे विद्यालयाच्या शैक्षणिक व सांस्कृतिक परंपरेत आणखी एक मानाचा अध्याय जोडला गेला असून परिसरात अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# भाकर जाधव ईडोळीकर यांच्या "हुंदका" या कादंबरीला राज्यस्तरीय पुरस्कार जाहीर

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** प्रभाकर केदारलिंग जाधव हे मूळचे ईडोळी येथील रहिवासी असून संत नामदेव अनुदानित आदिवासी आश्रम शाळा जांभरुण आंध ता.जि.हिंगोली येथे प्राथमिक शिक्षक या पदावर कार्यरत आहेत. प्रज्ञा बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र समूहातर्फे आयोजित राज्यस्तरीय प्रकाशित साहित्य पुरस्कार स्पर्धेत शिक्षक कवी तथा सुप्रसिद्ध कादंबरीकार प्रभाकर जाधव ईडोळीकर यांच्या ''हुंदका'' या कादंबरीला राज्यस्तरावर तृतीय क्रमांक प्राप्त झाला झाला आहे. पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या हस्ते रविवार दि.५ एप्रिल २०२६ रोजी १४ व्या राज्यस्तरीय मराठी साहित्य संमेलनात बाबुराव धनवटे सभागृह,होकार्ड हॉस्पिटलच्या बाजूला,अंबाझरी मार्ग शंकर नगर नागपूर येथे प्रदान करण्यात येणार असल्याचे निवडपत्र संस्थेच्या अध्यक्षा सुप्रसिद्ध गझलकार, कादंबरीकार सौ. लीनाताई देगलूरकर यांनी दिले आहे. पुरस्कारासाठी कादंबरीची निवड कर्नल शरदचंद्र पाटील पुणे यांनी केली आहे.

या अगोदर प्रभाकर जाधव हे हिंगोली येथील सिंधू बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेचा ''मराठवाडा रत्न पुरस्कार'', ''स्व. मारोतराव कऱ्हाळे राष्ट्रीय आदर्श शिक्षक पुरस्काराने''



सन्मानित झालेले आहेत.

प्रभाकर जाधव यांनी हा पुरस्कार ज्येष्ठ कादंबरीकार बाबाराव मुसळे (वाशिम), वडील ज्येष्ठ गायक स्व. केदारलिंग आजा ईडोळीकर, गुरुवर्य कवी तथा ऐतिहासिक कादंबरीकार स्व. नरेंद्र नाईक सर (नांदेड), स्व. सोनाबाई तथा डॉ. श्रीराम पवार (अध्यक्ष संत नामदेव शिक्षण प्रसारक मंडळ जांभरुण आंध),स्व. डॉ. रा.रं. बोराडे (सुप्रसिद्ध कादंबरीकार), स्व. डॉ.नागनाथ कोत्तापल्ले (सुप्रसिद्ध साहित्यिक तथा से. नि.कुलगुरू डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर),मुकुल बोरसे (छत्रपती संभाजी नगर), ग्रामीण कथाकार स्व.भास्कर चंदनशिव सर (कळंब)स्व. जयराम मस्के, स्व. शंकर घोंगडे,स्व. यशोदाबाई घोंगडे यांच्या पावन चरणी अर्पण केला.

प्रभाकर जाधव यांच्या या यशाबद्दल बाळासाहेब पवार (अध्यक्ष संत नामदेव शिक्षण प्रसारक मंडळ जांभरुण आंध),यादवेंद्र पवार (सचिव संत नामदेव शिक्षण प्रसारक मंडळ जांभरुण आंध),संदीप पवार , रत्नदीप पवार, साहित्यिक अशोक अर्धापूरकर(जिल्हाध्यक्ष म.सा.प. हिंगोली), भ.मा. परसवाळे (कवी तथा राष्ट्रीय चित्रकार), डॉ.संजय नाकाडे (कवी),नामदेव वाबळे (कवी), गणेश येवले (कवी) ब्रह्मानंद नाईक (शिवसेना उपजिल्हाप्रमुख ),वसंत वाकुडकर,गजानन थळपते,नामदेव जाधव महेंद्र पुरी, प्रद्युम्न गिरीकर,शिवाजी जाधव, गजानन जाधव.नामदेव मस्के आदींनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

# आधारभूत किंमत खरेदी योजनेंतर्गत हरभरा (चना) खरेदी सुरु, जिल्ह्यात ११ खरेदी केंद्र निश्चित

**आत्ताच एक्सप्रेस**

**हिंगोली–** हंगाम २०२५/२०२६ मध्ये केंद्र शासनाने निश्चित केलेल्या आधारभूत किंमतीनुसार हरभरा (चना) खरेदी योजना जिल्ह्यात सुरु करण्यात येत आहे. महाराष्ट्र राज्य सहकारी पणन महासंघ, मुंबई व एनसीसीएफ, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने ही योजना राबविण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत शेतकरी नोंदणी दि. १ मार्च ते ३१ मार्च २०२६ या कालावधीत करण्यात येणार असून, केंद्र शासनाने हरभरा (चना) साठी प्रती क्विंटल ५ हजार ८७५ रुपये असा आधारभूत दर निश्चित केला आहे.

जिल्ह्यात हरभरा खरेदीसाठी एकूण ११ खरेदी केंद्र निश्चित करण्यात आले असून, त्याचा तपशील पुढीलप्रमाणे आहे.

हजरत नासरगंज बाबा स्वयंसेवी सेवा सहकारी संस्था म. हिंगोली या संस्थेचे खरेदी केंद्र येहळेगाव ता. औंढा नागनाथ येथे आहे. येथे केंद्र चालक शेख गफार शेख अली हे ९८८१५०१०४० आहे. औंढा नागनाथ तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्या. औंढा (ना) या संस्थेचे खरेदी केंद्र जवळा बाजार ता. औंढा नागनाथ येथे आहे. या संस्थेवर केंद्र चालक कबीर बशीर कुरेशी हे ९७६७६८०७८०आहे. श्री संत नामदेव स्वयंरोजगार सहकारी संस्था म. चोरजवळा या संस्थेचे खरेदी केंद्र कन्हेरगाव ता. जि. हिंगोली येथे आहे. या संस्थेवर केंद्रचालक अमोल काकडे हे ८००७३८६१४३ आहेत. विजयलक्ष्मी बेरोजगार सहकारी संस्था म. कोळसा ता. सेनगाव या संस्थेचे खरेदी केंद्र साखरा ता. सेनगाव येथे आहे. केंद्र चालक उमाशंकर माळोदे हे काम पाहणार आहेत. त्यांना ९४०३६५१७४३ क्रमांकावर संपर्क साधावा.

श्री संत भगवानबाबा स्वयंरोजगार सेवा संस्था कोथळज या संस्थेचे खरेदी केंद्र सेनगाव येथे आहे. केंद्र चालक निलेश पाटील ९८८११६२२२२ हे असून, वसमत तालुका सहकारी खरेदी विक्री संघ मर्यादित, वसमत या संस्थेचे खरेदी केंद्र वसमत येथे आहे. केंद्र चालक सोपान बोकारे हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ९८३४८५१४८५ असा आहे. शेतकरी फळे व भाजीपाला खरेदी विक्री प्रक्रिया सहकारी संस्था शिरड शहापूर ता. औंढा नागनाथ या संस्थेचे खरेदी केंद्र भेंडेगाव येथे आहे. केंद्र चालक सुभाष सोनटक्के हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ८७८८२३२८३० असा आहे. स्वाभिमानी स्वयंरोजगार सेवा सहकारी रिधोरा या संस्थेचे खरेदी केंद्र नर्सी नामदेव येथे आहे. केंद्र भागवत रोडगे हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ७४९९९८५४४८ असा आहे.

श्री बेलेश्वर फार्मर प्रोड्यूसर कंपनी लि.गोरेगाव या संस्थेचे खरेदी केंद्र पुसेगाव येथे आहे. केंद्र चालक माधव गाडे हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ९४२३७३७६७२ असा आहे. वाबळे ॲन्ड ऑदर फार्मर प्रोड्यूसर कंपनी भांडेगाव ता.जि.हिंगोली या संस्थेचे खरेदी केंद्र उमरा येथे आहे. केंद्र चालक जगन वाबळे हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ९९२३८४७६३४ असा आहे. अभिमन्यू सुशिक्षित बेरोजगार सेवा सहकारी संस्था म. करंजाळा ता.जि.हिंगोली या संस्थेचे खरेदी केंद्र डिग्रसफाटा येथे आहे. केंद्र चालक रामराव कऱ्हाळे हे काम पाहणार आहेत. त्यांचा संपर्क क्रमांक ९१५८६४८२३४असा आहे.

शेतकरी बांधवांनी हरभरा विक्रीसाठी आपल्या नजीकच्या खरेदी केंद्रावर जाऊन नोंदणी करणे आवश्यक आहे. नोंदणीसाठी आधार कार्ड, बँक पासबुक, चालू वर्षाचा सातबारा उतारा व पिकपेरा यांसारखी कागदपत्रे सादर करणे आवश्यक असून, नोंदणी प्रक्रिया ऑनलाईन पद्धतीने पॉस मशीनद्वारे करण्यात येणार आहे.

नोंदणी पूर्ण झाल्यानंतर संबंधित शेतकऱ्यांना एसएमएसद्वारे सूचना देण्यात येईल. त्यानंतरच शेतमाल विक्रीसाठी खरेदी केंद्रावर आणावा. ही योजना शेतकऱ्यांना त्यांच्या शेतमालाला हमीभाव मिळावा यासाठी राबविण्यात येत असल्याने जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी या योजनेचा लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा पणन अधिकारी, हिंगोली यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.



# बाबा सोनापीर उर्स आनंदात साजरा करा

## तहसीलदार अभिजीत जगताप यांचे अधिकारी पदाधिकाऱ्यांना बैठकीत आवाहन, बैठकीनंतर बाबा सोनापीर दर्गाह परिसराची केली सर्व अधिकारी पदाधिकाऱ्यांनी पाहनि

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर** – माहूर गडावरील सुफी संत बाबा सोनापीर यांच्या शहरातील दर्गाह येथे दि ५ मार्च ते १० मार्च पर्यंत पार पडणाऱ्या उर्स निमित्त माहूर तहसील कार्यालयात तहसीलदार अभिजीत जगताप यांचा उपस्थितीत आढावा बैठक पार पडली या बैठकीत तहसीलदार अभिजित जगताप यांनी होणारा उर्स आनंदात साजरा करत भाविकांना कुठलाही त्रास होऊ नये याची दक्षता घेण्याचे आवाहन बैठकीत करून त्यांनी बाबा सोनापीर दर्गाह परिसराची अधिकारी पदाधिकाऱ्यांना घेऊन पाहणी आवश्यक सूचना दिल्या



माहूर गडावर साजरा होणाऱ्या बाबा सोनापीर उरसात देशातील अनेक राज्यासह देश विदेशातील भाविक दर्शनासाठी सामील होत असतात या ठिकाणी लहान मुलांना मनोरंजनाचे सर्व साहित्य व्यावसायिक दुकाने हॉटेल्स व इतर मनोरंजनात्मक साहित्य घेऊन व्यापारी येत असल्याने लाखोंच्या संख्येने सर्वधर्मीय भाविक येथे येतात

त्यामुळे महसूल प्रशासनाकडून यात्रा नियोजनाप्रमाणे येथेही सर्व सुविधा पुरविण्यात येतात तहसीलदार अभिजीत जगताप यांचे सह बैठकीत मुख्याधिकारी विवेक कांदे पोलीस उपनिरीक्षक शरद घोडके नायब तहसीलदार कैलास जेठे नायब तहसीलदार सूर्यवंशी मॅडम तालुका आरोग्य अधिकारी डॉ राजेश माचेवार मरविमचे राहुल शेंडे आरोग्य विभागाचे डॉ आंबेकर वन विभागाचे वनपाल एम एन कत्तुलवार सज्जादा नशीन साजिदउल्ला जागीरदार मुजावर बाबर अहमद फकीर मोहम्मद साबाचे के एस राठोड एस जी मुखेडकर महसूल सहाय्यक सी पी बाबर शेख अकबर भाई ताहेर भाई ठेकेदार बीएसएनएलचे जावेद भाई यांचे सर्व पत्रकार मान्यवर उपस्थित होते या सर्वांनी बैठकीनंतर बाबा सोनापीर दर्गाह येथे जाऊन भाविकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधाची पाहणी करून तहसीलदार अभिजीत जगताप यांनी योग्य त्या सूचना देत उर्स महोत्सव आनंदात साजरा करावा असे आवाहन केले मुजावर बाबर अहमद फकीर मोहम्मद यांच्याकडून आलेल्या सर्व मान्यवरांचा यथोचित सत्कार करण्यात आला.



## पहाटेच्या व्यायामादरम्यान दुर्दैवी अपघात अज्ञात वाहनाच्या धडकेत महिलेचा मृत्यू

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

किनवट – तालुक्यातील गोकुंद्यानजिक असलेल्या कोठारी येथील नंदाबाई गौतम पाईकराव (वय ५०) यांचा आज पहाटे सुमारे ५ वाजण्याच्या सुमारास दुर्दैवी मृत्यू झाला. त्या रोजच्या प्रमाणे सकाळी व्यायामासाठी घराबाहेर पडल्या होत्या. लगत असलेल्या महामार्गावर पेट्रोल पंपाजवळून जात असताना अज्ञात वाहनाने जोरदार धडक दिल्याने त्यांचा जागीच मृत्यू झाला.

अपघातानंतर वाहनचालक घटनास्थळावरून पसार झाला. स्थानिक नागरिकांनी तात्काळ मदत करण्याचा प्रयत्न केला; मात्र धडक इतकी जबर होती की त्यांचा जागीच मृत्यू झाल्याचे समजते. घटनेची माहिती मिळताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत पंचनामा करून मृतदेह पुढील कार्यवाहीसाठी पाठविला. अज्ञात वाहनाचा शोध सुरू असून परिसरातील सीसीटीव्ही फ ुटेज तपासले जात आहे.

या घटनेमुळे परिसरात हळहळ व्यक्त होत असून पहाटे व्यायामासाठी जाणाऱ्या नागरिकांच्या सुरक्षिततेचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला आहे.

## राज्यमहामार्गावरील गोठ्यातून १० शेळ्या १ बोकड मध्यरात्री चोरीला



* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – दि. २४ फेब्रुवारीच्या मध्यरात्री इस्लापूर रेल्वे स्टेशन कॉर्नरवर असलेल्या येथील सदन शेतकरी यादव गणपतराव पळसपुरे यांच्या शेत सर्वे क्रमांक २४० मधील गोठ्यातून दहा शेळ्या व एक बोकड गोठ्याची जाळी कापून गोठ्यातील शेळ्या अज्ञात व्यक्तीने चोरून बाजारपेठेत विक्रीसाठी नेल्याची घटना घडली. विशेषतः मुख्य मार्गावरील रेल्वे स्टेशनच्या कॉर्नरला लागून वरदळीच्या मुख्य रस्त्यावर हा गोठा असल्याने या शेळ्या चोरी प्रकरणाकडे संबंधित विभागाने लक्ष वेधने गरजेचे बनले आहे. गेल्या दोन वर्षभराच्या कालावधीमध्ये इस्लापूर येथील मुख्य रस्त्यावरून गावातील जवळपास २५ शेतकऱ्यांची ५० जनावर चोरीला गेली पण या प्रकरणी कुणीही पोलिसात तक्रार न दिल्याने गुन्हा नोंद होऊ शकला नाही. चोरट्याने एकाच ठिकाणावरून दहा शेळ्या चोरून नेण्याची धाडस केल्या असल्याच्या प्रतिक्रिया जनसामान्यातून ऐकावयात मिळत आहेत.मागील जनावरे चोरी प्रकरणी जर येथील सुज्ञ नागरिकांनी तक्रार पोलिसात दिली असती तर आज ही घटना घडली नसती एकाच ठिकाणाहून दहाच शेळ्या चोरीस गेल्याने परिसरातील शेळी पालन करणाऱ्या व्यवसायिकामध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले. शेळी चोऱ्याप्रकरणी येथील सदन शेतकरी यादव पळसपुरे यांनी इस्लापूर पोलिसात रीतसर तक्रार दिली. पण अद्याप पर्यंत या घटनेचा पोलिसात कुठलाही गुन्हा दाखल झालेला नाही. या घटनेकडे पोलीस गांभीर्याने पहातील का ? अशा स्वरूपाचा सुर जनतेतून ऐकायला मिळत आहे.

# किनवट महसूल प्रशासनाची मध्यरात्री धडक कारवाई; सिंगरवाडी येथे अवैध रेती वाहतूक करणारे ३ ट्रॅक्टर जप्त

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** - तालुक्यात सुरू असलेल्या अवैध रेती उत्खनन व वाहतुकीवर महसूल प्रशासनाने मध्यरात्री धडक कारवाई करत कठोर संदेश दिला आहे. मा. सहाय्यक जिल्हाधिकारी किनवट श्री. जेनीतचंद्र दोंन्तुला यांच्या मार्गदर्शनाखाली तसेच मा. तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर यांच्या नेतृत्वात २५ फेब्रुवारी २०२६ रोजी रात्री सुमारे ११.३० वाजता मौजे सिंगरवाडी (ता. किनवट) येथे छापा टाकण्यात आला.



या कारवाईदरम्यान विना परवाना रेती वाहतूक करणारे ३ ट्रॅक्टर व ट्रॉली रेतीसह रंगेहात पकडण्यात आले. जप्त करण्यात आलेली वाहने तहसील कार्यालय किनवट येथे जमा करण्यात आली असून पुढील कायदेशीर कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे.

अवैध रेती वाहतूक ही शासन महसुलाला मोठा फटका देणारी तसेच पर्यावरणाला हानी पोहोचवणारी गंभीर समस्या बनली आहे. नदीपात्रांचे नुकसान, भूजल पातळीतील बदल आणि पर्यावरणीय समतोल बिघडण्यामागे अशा बेकायदेशीर उत्खननाचा मोठा वाटा असल्याने प्रशासनाने कठोर भूमिका घेतल्याचे या कारवाईतून स्पष्ट झाले आहे.

या धडक मोहिमेत ग्राम महसूल अधिकारी अनुसया इप्पलवाड, सिंधू आत्राम, शालन मेंडके, आदिनाथ डुकरे, श्रीनिवास रेड्डीवार, दीपक पडोळे, अक्षय महाले, मंगेश बोधे, विश्वास फड, शुभम जेलेवाड, सुशील जाधव तसेच मंडळ अधिकारी डी. आर. कांबळे यांचा सक्रिय सहभाग होता.

महसूल विभागाच्या या कारवाईमुळे अवैध रेती माफियांमध्ये खळबळ उडाली असून पुढील काळातही अशाच धडक कारवाया सुरू राहतील, असा इशारा प्रशासनाकडून देण्यात आला आहे. कायद्याचे उल्लंघन करून नैसर्गिक संपत्तीची लूट करणाऱ्यांना आता कुठलीही सवलत मिळणार नाही, असा स्पष्ट संदेश या कारवाईतून देण्यात आला आहे.

# माहूरमध्ये बारावी परीक्षेत नक्कल प्रकरण उघडकीस

## तहसीलदारांच्या पथकाच्या कारवाईने शिक्षण क्षेत्राला हादरा, महिला बाथरूम मध्ये कॉपी आली कुठून शहरात जोरदार चर्चांना उधाण

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**श्रीक्षेत्र माहूर** – श्रीक्षेत्र माहूर शहरातील नामांकित श्री जगदंबा विद्यालयात बारावीच्या जीवशास्त्र विषयाचा पेपर सुरू असताना दि. २५ फ ेब्रुवारी रोजी दुपारी १.१७ वाजता तहसीलदार अभिजित जगताप यांच्या पथकाने अचानक तपासणी केली असता एका विद्यार्थिनी जवळ बाथरूम मधून वर्गात जात असताना वर्गाबाहेर नक्कल आढळून आली. या घटनेमुळे शिक्षण क्षेत्रात मोठी खळबळ उडाली आहे. विविध चर्चांना उधाण आले आहे

मिळालेल्या माहितीनुसार, तहसीलदार अभिजित जगताप परीक्षा तपासणीसाठी श्री जगदंबा विद्यालयात गेले असता परीक्षा सुरू असताना दोन विद्यार्थिनी वर्गखोली बाहेरील बाथरूममधून वर्ग खोलीकडे येताना दिसल्या संशय आल्याने त्यांनी त्यांची झडती घेण्याचे निर्देश दिले असता एका विद्यार्थिनी जवळ कॉपी आढळून आली. तत्काळ संबंधितांवर नियमानुसार कारवाईची प्रक्रिया सुरू करण्यात आली.

एका बाजूला प्रशासनाकडून परीक्षा सुरू असलेल्या विद्यालयावर कडक देखरेख केली जात असताना दुसऱ्या बाजूला परीक्षा केंद्रांवर नक्कल प्रकरणे उघड होत असल्याने वर्गावरील शिक्षक, बैठे पथक, गटशिक्षणाधिकारी, गटविकास अधिकारी पोलीस तसेच जिल्हास्तरीय पथकांच्या जबाबदारीबाबत प्रश्न उपस्थित होत आहेत. विशेष म्हणजे, श्री जगदंबा विद्यालयाच्या महिला बाथरूममध्ये विद्यार्थ्यांना नक्कल साहित्य सहज कसे उपलब्ध झाले, हा देखील चौकशीचा विषय ठरत असून महिला लघु शंका गृहामध्ये कॉपी आली कुठून हा विषय शहरात जोरात सुरू असल्याने जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांनी माहूर मध्ये सुरू असलेल्या परीक्षेचे सीसीटीव्ही



फुटेज तपासावे अन्यथा जिल्हाधिकारी यांना जे दाखवले गेले तेच दिसेल गैरप्रकार दिसणार नाहीत अशी जोरदार चर्चा सुरू असून वरून कीर्तन आतून तमाशा असा प्रकार होऊन दोषी नसणाऱ्या अधिकारी कर्मचारी विद्यालयावर विनाकारण कारवाई होऊन अन्याय होईल अशी चर्चा होत आहे.

## माजी सैनिकांसाठी भरती मेळावा

आत्ताच एक्सप्रेस

**नांदेड** – मराठा लाईट इन्फंट्री रेजिमेंटल सेंटर बेळगावी (कर्नाटक) येथे डिफेन्स सिक्युरिटी कॉर्प्स (डी.एस.सी.) एन. सी.ओ. भरती मेळावा (जी.डी. आणि क्लर्क) मराठा लाईट इन्फंट्रीच्या नियमित टेटोरियल आर्मीच्या माजी सैनिकांसाठी १६ मार्च २०२६ पासून रेजिमेंट सेंटरमध्ये शिपाई आणि क्लर्कसाठी डी. एस.सी. मध्ये नोंदणीसाठी डी.एस.सी. एन.सी.ओ. भरती मेळावा आयोजित करण्याचे वेळापत्रक आहे.

नियुक्त झालेल्या माजी सैनिकांना शारीरिक चाचणी मार्गदर्शक तत्त्वांनुसार भारतीय सैन्यातील व्यक्तीला लागू असलेल्या संयुक्त शारीरिक चाचणी (सी.पी.टी.)साठी चाचणी घेणे आवश्यक आहे. ही चाचणी भारतीय सैन्याच्या वयानुसार संरक्षण सुरक्षा कॉर्प्स (डी. एस. सी.) मध्ये पुन्हा नोंदणीसाठी घेतली जाईल. माजी सैनिकांना सदर रॅली दरम्यान कॉम्बॅट ड्रेस आणि डी.एम.एस. आणण्याचा सल्ला देखील दिला जातो.

इच्छुक असलेल्या माजी सैनिक यांनी दिलेले वेळेवर बेळगावी येथे उपस्थित रहावे, असे आवाहन निवासी उपजिल्हाधिकारी तथा जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी किरण अंबेकर यांनी केले आहे.

## पीएम सूर्यघर मुफ्त बिजली योजनेची प्रभावी अंमलबजावणीसाठी करा-जिल्हाधिकारी राहुल गुप्ता

आत्ताच एक्सप्रेस

**हिंगोली** – पी एम सूर्यघर मोफत वीज या महत्त्वाकांक्षी योजनेची प्रभावी अंमलबजावणी करण्याचे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज झालेल्या आढावा बैठकीत दिले. जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली महाऊर्जा व महावितरण विभागाची संयुक्त आढावा बैठक घेण्यात आली.

महाऊर्जा विभागांतर्गत राबविण्यात येत असलेल्या पी एम सूर्यघर मोफत वीज योजना या महत्त्वाकांक्षी योजनेचा सविस्तर आढावा घेण्यात आला.

यावेळी हिंगोली जिल्ह्यातील विविध शासकीय इमारतींवर पारेषण सलग्न सौर ऊर्जा संच



बसविण्याच्या कामाची सद्यस्थिती तपासण्यात आली. तसेच प्रकल्पाच्या अंमलबजावणीदरम्यान येत असलेल्या तांत्रिक अडचणी, पारेषण यंत्रणेशी समन्वय, वीज जोडणी प्रक्रिया आदी मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

महाऊर्जाचे जिल्हा व्यवस्थापक प्रशांत गायकवाड व महावितरणचे अधीक्षक अभियंता सुरेंद्र मुंगारे यांना सदर प्रकल्पाची कामे गतीने पूर्ण करून योजना लवकरात लवकर कार्यान्वित करण्याच्या सूचना देण्यात आल्या. तसेच दोन्ही विभागांनी परस्पर समन्वय साधून येणाऱ्या तांत्रिक अडचणी तात्काळ दूर कराव्यात व योजनेची उद्दिष्टे यशस्वीपणे साध्य करावीत, असे निर्देश जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले.

या बैठकीमुळे जिल्ह्यात सौर ऊर्जेचा वापर वाढीस लागून ऊर्जा बचत व पर्यावरण संरक्षणाला चालना मिळणार असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

# अवैध रेती वाहतूक करणाऱ्या ऑटोवर पोलिसांची कार्यवाही

* आत्ताच एक्सप्रेस
**लक्ष्मीकांत मुंडे**

**किनवट** – अवैध रेती वाहतुकीविरोधात पोलिसांनी धडक कारवाई करत दिड ब्रास रेतीसह एक ऑटो जप्त केला आहे. याप्रकरणी गुन्हा क्रमांक ३५/२६ अन्वये भा.न्या.सं. कलम ३०३(२) तसेच महाराष्ट्र जमीन महसूल कायदा कलम ४८(७), ४८(८), ९ व १५ अंतर्गत गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, किनवट परिसरात अवैध रेती उत्खनन व वाहतूक सुरू असल्याची गोपनीय माहिती पोलिसांना मिळाली होती. त्यानुसार पोलिस निरीक्षक गणेश कराड यांच्या मार्गदर्शनाखाली विशेष पथकाने सापळा रचून ही कारवाई केली.

या कारवाईत पोलिस हेड कॉन्स्टेबल प्रदीप आत्राम, ओंकार पुरी, डुकरे तसेच पोलिस अंमलदार संजय राजने, झुंझावार, अन्नमवार आणि गृहरक्षक राजू राठोड यांचा समावेश होता. पथकाने छापा टाकून दिड ब्रास (अंदाजे १.५ ब्रास) रेती, ज्याची किंमत सुमारे ३,००० रुपये आहे, जप्त केली. तसेच रेती वाहतुकीसाठी वापरला जाणारा अंदाजे ३०,००० रुपये किमतीचा ऑटोही ताब्यात घेण्यात आला. सदर प्रकरणात संबंधित वाहनचालकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. अवैध रेती




उत्खनन व वाहतूक रोखण्यासाठी पोलिसांकडून सातत्याने कारवाई करण्यात येत असून बेकायदेशीर कृत्यांविरुद्ध कठोर भूमिका घेतली जाणार असल्याचे पोलिस प्रशासनाने स्पष्ट केले आहे.

या कारवाईमुळे अवैध रेती व्यवसाय करणाऱ्यांमध्ये खळबळ उडाली असून परिसरात कायद्याची प्रभावी अंमलबजावणी होत असल्याचे चित्र दिसून येत आहे.

हे पत्रक मालक, मुद्रक, प्रकाशक सुग्रीव सोपानराव मुंडे यांनी फाईन प्रिंट, १४०७०, खोकडपूरा, औरंगाबाद ४३१००१ (महाराष्ट्र), येथे छापून लक्ष्मी ऑफसेट, डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुतळ्या जवळ, रेल्वे स्टेशन रोड, परभणी जि.परभणी-४३१४०१ (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले. मुख्य कार्यालय ०२४०-२४७४८१३ * **संपादक - सुग्रीव सोपानराव मुंडे** मो.9421281078, RNI.No.MAH/MAR2014/56289

The Printer, Owner & Publisher Sugriv Sopanrao Munde Fine print,14070,khokadpura, Aurangabad-431001 (M.H.) Laximi offset,Near Dr.babasahen ambedkar,statue,station road, parbhani Dist. Parbhani-431401.(edition editor Laximikan mundhe) (cheif Editor - Sugriv Sopanrao Munde) Office Ph. : 0240-2474813